# माणूस

शनिवार । ९ सप्टेंबर १९७८ । ७५ पैसे

एकीकडे लक्षावधी हात बेकार आहेत.
दुसरीकडे २० दशलक्ष टन धान्याचा साठा पडून आहे.
येथील उत्पादकशक्ती वाढत नाहीत.
आपण एका विचित्र कोंडीत सापडलो आहोत.
हे असेच चालू राहिले तर
नवे राज्यकर्तेही पुन्हा
हुकूमशाहीकडे झुकणार तर नाहीत ना ?

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ
कांता रणदिवे
यांची विशेष मुलाखत

## पुढील अंकी

# सवंग लोकप्रिय आर्थिक घोषणांनी प्रश्न सुटेल काय ?

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक पंधरावा

९ सप्टेंबर १९७८

मूल्य ७५ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

**सौ. निर्मला पुरंदरे**

◻

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

◻

दूरध्वनी : ४४३४५९

◻


राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# आचारसंहिता : जनता ' पार्टी 'चा नवा वर्ग

जनता पक्षाच्या कार्यकारिणीने आपल्या ताज्या बैठकीमध्ये, सदस्यांसाठी आचारसंहिता तयार करण्याचा खटाटोप केलेला असला तरी या संहितेचे पालन कोण करणार हा खरा प्रश्न आहे. कारण सदस्यांकडून पक्षशिस्तीचा अवलंब व्हावा अशी अपेक्षा करण्याचा अधिकारच या पक्षाच्या नेत्यांनी आपल्या अलीकडच्या बेजबाबदार वर्तनाने गमाविला आहे. आम्ही कसेही वागलो तरी त्यासंबंधी कोणी काही बोलू नये, इतरांनी मात्र आपले आचरण चोख ठेवले पाहिजे अशीच जर जनता पक्षाच्या श्रेष्ठांची अपेक्षा असेल, तर गोष्ट वेगळी. एरवी या नेत्यांचा आणि शिस्तीचा संबंधच काय असा रोखठोक सवाल कोणी विचारला तर या बुजुर्ग नेत्यांपैकी एकालाही प्रामाणिकपणे समाधानकारक उत्तर देता येणार नाही.

### महत्त्वाकांक्षेचा वारू

शिस्तीसह पक्षाला आणि सभ्यतेसह समंजसपणाला चूड लावण्याचा पहिला पराक्रम कोणी केला असेल तर तो चरणसिंग यांनी. कॉंग्रेसी कार्यकर्त्याला साजेशा कारवाया करून, मीरत जिल्हा आपल्या हातात ठेवणाऱ्या आणि त्या आधारावर उत्तरप्रदेशाच्या राजकारणात अनेक कोलांटउड्या मारलेल्या या माणसाला अगदी अनपेक्षितपणे केंद्रीय सत्तेत सहभागी होण्याचा योग आल्यापासून त्यांच्या महत्त्वाकांक्षेला गगनही ठेंगणे वाटू लागले. त्यांच्या या महत्त्वाकांक्षेला आपल्या परीने हातभार लावण्याचे कार्य त्यांच्या भालोदनेही चालू ठेवले आहे. भारतीय लोकदल हे नाव नंतरचे आहे. या पक्षाचे मूळचे नाव भारतीय क्रांतिदल. कॉंग्रेसशी काडीमोड घेऊन चरणसिंगांनी या वेगळ्या पक्षाची स्थापना केली ती स्वतःला मुख्यमंत्रिपद मिळावे याच एकमेव हेतूपायी! त्यामुळे चरणसिंग स्वतः जरी, आपण ग्रामीण जनतेचे प्रतिनिधी आहोत असा दावा करीत असले तरी त्यात तत्त्वनिष्ठेपेक्षा सोयीचा भाग अधिक आहे यासंबंधी कोणीही गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. संयुक्त समाजवादी पक्षातील एक गट आणि नाममात्र राहिलेला स्वतंत्र पक्ष यांनी भारतीय क्रांतिदलात आपले विसर्जन करून घेतले तेव्हा पक्षाच्या मूळ नावातील क्रांती या शब्दाची जागा लोक या शब्दाने घेतली इतकेच. समाजवाद हा शब्दही आपल्याला सहन होत नाही असे सांगणाऱ्या चरणसिंगांशी काही संयुक्त समाजवाद्यांना हातमिळवणी करावीशी वाटली, यावरून त्यांनाही आपल्या सिद्धांताविषयी आस्था वगैरे किती आहे हेही दिसून आले.

आणीबाणीत सर्वांत अधिक पंचाईत कोणाची झाली असेल तर ती चरणसिंगांची! हुकुमशाहीला विरोध, नागरी स्वातंत्र्याच्या पुर-

स्कारासाठी निदर्शने आदी गोष्टी चरणसिंगांना झेपण्यासारख्या नव्हत्या. म्हणून इंदिरा गांधींनी त्यांना स्थानबद्ध केल्यानंतरही हे महाशय तुरुंगातूनही इंदिरा गांधींशी समझोता करता येईल काय या दृष्टीने चाचपणी करीत होते तो प्रयत्न फसल्यानंतरच चरणसिंगांनी जनता पक्षाच्या उभारणीमध्ये मन घातले. तेव्हाही, या नव्या पक्षाचे अध्यक्षपद आपल्यालाच मिळावे यासाठी त्यांनी जंगजंग पछाडले. ती वेळ अशी होती की, अध्यक्षपद मिळाले नाही म्हणून संतापून जाऊन जनता पक्षातून बाहेर पडणे चरणसिंगांना सोयीचे नव्हते. म्हणून त्यांनी उपाध्यक्षपदावर समाधान मानले. जनता पक्षाला निवडणुकीत यश मिळाले तर आपल्याला पंतप्रधानपदावर अधिकार सांगता यावा हाच त्यामागचा विचार होता. जनता पक्ष लोकसभेच्या निवडणुकीत विजयी झाला; परंतु पंतप्रधानपदासाठी चरणसिंगांचे नाव कोणीच घेईना. मोरारजी देसाई की जगजीवनराम असा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा जगजीवनरामांना विरोध करण्यासाठी चरणसिंगांनी मोरारजीभाईंच्या उमेदवारीचा पुरस्कार केला. या पुरस्काराच्या बदल्यामध्ये आपल्याला उपपंतप्रधानपद मिळेल असा त्यांचा कयास होता; पण तोही चुकीचा ठरला. कारण चरणसिंगांना ते पद मिळणार असेल तर आपल्याही मिळाले पाहिजे, असा पंतप्रधानपद गमवावे लागल्यामुळे रुष्ट झालेल्या जगजीवनरामांनी हट्ट धरला. त्यामुळे मोरारजीभाईंनी कोणालाच उपपंतप्रधान करायचे नाही असे ठरविले.

हा सारा गेल्या वर्षाच्या पूर्वार्धामध्ये घडलेला इतिहास ध्यानात घेतला की, चरणसिंगांनी गेल्या दोन-चार महिन्यांमध्ये वेताळाची भूमिका का घेतली यामागचा कार्यकारणभाव कळून येतो. आपले भारतीय लोकदल जनता पक्षातून बाहेर पडू नये यासाठी आपली मनधरणी केली जाईल या विश्वासातून प्रथम त्यांनी कार्यकारिणीचा आणि संसदीय मंडळाचा राजीनामा दिला. त्याचा उपयोग होत नाही असे दिसून आल्यावर त्यांनी पंतप्रधान मोरारजी देसाई आणि पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्या विरुद्धची मोहीम अधिक जोरदार केली. त्यापायी आपल्याला मंत्रिपद गमवावे लागेल याचा जर त्यांना अंदाज आला असता तर ते साऱ्या मंत्रिमंडळाला ' नामर्दांचा कंपू ' असे जाहीरपणे म्हणण्याच्या टोकाला गेले नसते. मोरारजीभाईंविरुद्धचा आपला संताप व्यक्त करण्याच्या भरामध्ये आपण साऱ्या मंत्रिमंडळावर आरोप करता कामा नये एवढे भान चरणसिंगांना राहिले नाही. कदाचित राजनारायण, मणिराम बागडी, शामानंदन मिश्र, रबी रॉय या त्यांच्या मित्रांनी त्यांना तसे करायला प्रवृत्त केले असावे. ते काहीही असो, चरणसिंग यांच्या बाबतीत योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार मंत्रिमंडळाने पंतप्रधानांकडे सोपविला आणि त्याप्रमाणे मोरारजीभाईंनी चरणसिंगांकडे राजीनामा मागितला.

## लिमये यांची पक्षपाती वृत्ती

मोरारजीभाईंच्या निर्णयामुळे जनता सरकारची ढासळलेली प्रतिष्ठा काही प्रमाणात तरी सावरली गेली. मंत्रिपद गमवावे लागल्यामुळे बेभान झालेले चरणसिंग आणि त्यांचे हरयाना—उत्तरप्रदेशातील समर्थक यांनी कितीही धमक्या दिल्या तरी मोरारजीभाई आपल्या निर्णयापासून परावृत्त झाले नाहीत आणि त्यामुळे त्यांचे पंतप्रधानपद अधिकच घट्ट झाले. अशा वेळी भालोदचा चरणसिंगनिष्ठ गट वगळता इतर सर्वांनी, पक्षाने निवडणूक जाहीरनाम्यामध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले असते तर लोकांच्या आपल्यासंबंधीच्या अपेक्षांचा या नेतृत्वाला विसर पडलेला नाही असे चित्र निर्माण होऊ शकले असते; परंतु मोरारजीभाईंचे स्थान बळकट व्हावे ही गोष्ट ज्यांना मंजूर नव्हती त्यांनी मोरारजीभाई आणि चरणसिंग यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी पुढाकार घेतला. याचा परिणाम चरणसिंग गटाचा शिरजोरपणा वाढण्यात झाला. मधू लिमये यांचा मोरारजीद्वेष प्रसिद्धच आहे. त्यामुळे परदेशदौरा आटोपून किंवा अर्धवट सोडून ते दिल्लीला परतताच त्यांनी चरणसिंगांच्या बाजूने मोरारजीभाईंवर दडपण आणायला सुरुवात केली. मधू लिमये स्वतःला मध्यस्थ म्हणवीत असले तरी ते चरणसिंगांचे प्रतिनिधी म्हणूनच वावरत होते. मोरारजींवर आपल्या तथाकथित मध्यस्थीचा दबाव यावा म्हणूनच त्यांनी कांति देसाईंने निवडणूकनिधीसाठी ऐंशी लाख रुपये जमविल्याचा गौप्यस्फोट केला. आपण पराकोटीचे निःस्पृह असल्यामुळे आपल्या पक्षातील भ्रष्टाचारही आपण सहन करणार नाही असाच मधू लिमये यांचा मोरारजीभाईंना कांति-प्रकरणामध्ये पत्र लिहिताना आविर्भाव होता. मधू लिमयें यांनी भ्रष्टाचार खपवून घ्यावा असे कोणीही म्हणणार नाही; पण कांतीच्या या बाबतीतील व्यवहाराची त्यांना पक्षाचे खजिनदार चंद्रभानू गुप्ता यांच्याकडून चौकशी करता आली असती. सरचिटणीस म्हणून मधू लिमये यांना तो अधिकारही होता; परंतु हा उचित मार्ग अनुसरण्या ऐवजी पंतप्रधानांना पत्र लिहिण्याचे आणि त्या पत्राचा आशय वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होईल अशी तजवीज करण्याचे त्यांनी ठरविले. यावरून मोरारजीभाईंना चरणसिंगांच्या बाबतीत नरमाईचे धोरण पत्करण्यास भाग पाडायचे हाच त्यांचा विचार स्पष्ट होतो. पक्षांतर बंदीला विरोध करणारे विधेयक जेव्हा सरकारतर्फे संसदेत मांडण्यात आले तेव्हाही मधू लिमये यांच्यासारख्या जबाबदार व्यक्तीला पक्षशिस्तीची पर्वा वाटू नये ही गोष्ट काय दर्शविते ? ते विधेयक किंवा त्यातील काही तरतुदी मधुजींना आक्षेपार्ह वाटत असतील तर त्यांनी विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याची सूचना करावयास हवी होती. त्याऐवजी अगदी इंदिरा कॉंग्रेसच्या सदस्याला शोभेल असा विरोध करण्यामागे त्यांचे सरकारची अप्रतिष्ठा करण्यावाचून दुसरे कोणते उद्दिष्ट असले पाहिजे ? जनता पक्षाची एकजूट ही आपल्याला सर्वांत महत्त्वाची गोष्ट वाटते असे मुलाखतीच्या वेळी तोंड भरून सांगणाऱ्या मधु लिमयांना आपले मतप्रदर्शन पक्षाच्या कोणत्या व्यासपीठावर करावे याचा विचार करण्याची गरज वाटू नये आणि आपल्या या वर्तनाचे समर्थन करता यावे म्हणून म्हटला तर दिला आहे, म्हटला तर दिला नाही अशा थाटात सरचिटणीसपदाचा राजिनामा धाडून द्यावा ही घटना त्यांची आत्मकेंद्रित वृत्तीच व्यक्त करते. मी सांगतो त्याप्रमाणे चरणसिंगांशी तडजोड करायला तयार व्हा, नाही तर माझा विरोध सहन करावा लागेल, असे आपल्या पक्षाच्या शासनप्रमुखाला बजावणाऱ्या व्यक्तीला पक्षैक्यापेक्षा आत्मगौरव महत्त्वाचा वाटतो, हाच निष्कर्ष यातून निघू शकतो.

## जगजीवनबाबूंचा विरोध

चरणसिगांणी आपल्यावर आणि आपल्या मंत्रिमंडळावर केलेले आरोप मागे घेतल्याशिवाय आपण त्यांना मंत्रिमंडळात घेणार नाही अशी मोरारजीभाईंनी भूमिका घेतल्यानंतर, चरणसिगांच्या पाठीराख्यांनी चरणसिगांना पक्षाध्यक्ष करून त्यांचा रुसवा काढून टाकण्याची योजना सुचविली. येथेही चरणसिगांना अध्यक्ष केल्यावर मोरारजीभाईंना त्यांच्या सल्ल्याने वागावे लागेल हाच डाव होता. चंद्रशेखर यांनी चरणसिग यांच्यासाठी अध्यक्षपद सोडण्याची तयारी व्यक्त केल्यानंतर जगजीवनराम यांनी उचल खाल्ली. चरणसिगांमुळे आपले पंतप्रधानपद हुकले ही गोष्ट जगजीवनराम विसरलेले नाहीत. मोरारजी देसाई आणि चरणसिग यांच्यातील वाद विकोपाला गेला आणि त्यापायी दोघांनाही सत्तेवरून दूर व्हावे लागले तर आपल्याला पंतप्रधानपद मिळू शकेल असा हिशोब करूनच जगजीवनबाबू आतापर्यंत गप्प बसले होते; परंतु चरणसिग दुसऱ्या मार्गाने बलिष्ठ होऊ पहात असतील तर त्याचा उपसर्ग आपल्याला पोहोचेल हे ओळखण्याइतके ते चतुर आहेत. म्हणूनच त्यांनी चरणसिग अध्यक्ष होणार असतील तर पक्षात रहायचे की नाही याचा आपल्याला विचार करावा लागेल हे मध्यस्थीसाठी लुडबूड करणाऱ्यांना सुनावले. हरिजनांवरील अत्याचारांच्या वेळी चरणसिगांनी जी उडवाउडवीची उत्तरे दिलेली असल्यामुळे त्यांना हरिजनांविरोधी मानण्यात येते. असा माणूस अध्यक्ष झाला तर हरिजन आपल्या पक्षापासून अधिकच दूर जातील या सबबीचा फायदा कृष्णकांत, रामधन आदी पूर्वाश्रमीच्या काँग्रेसजनांना घेता आला. लोकशाहीवादी काँग्रेस, संघटना काँग्रेस, बंडखोर काँग्रेसला आणि जनसंघ या घटकांनी चरणसिगांना पक्षाध्यक्षपद द्यायच्या सूचनेला विरोध केल्यानंतर चरणसिग गटावर आणखी एकदा माघार घेण्याची पाळी आली. मधु लिमये यांचा हा शेवटचा प्रयत्नही बूमरँगसारखा त्यांच्यावरच उलटला. चरणसिग गट आणि जगजीवनराम गट यांच्यातील तेढ केवढ्या विकोपाला गेली आहे हे सुरेशकुमार–सुषमा चौधरी प्रकरणामुळे स्पष्ट झाले. वर्षभर सूचक मौन पाळलेल्या जगजीवनरामांची सुरेशकुमारने भलतीच पंचाईत केलेली आहे.

मुलगा भोवावा असेच सध्याचे राजकीय वातावरण आहे.

तसे नसते तर केवळ सार्वजनिक जीवनामध्येच नव्हे तर वैयक्तिक जीवनातही शुचिता सांभाळली पाहिजे असे मानणाऱ्या आणि म्हणणाऱ्या मोरारजीभाईंनी कांति देसाई हा नाहक प्रतिष्ठेचा प्रश्न केलाच नसता. खरे म्हणजे इंदिरा-संजय या मायलेकरासंबंधीची जनमानसातील प्रतिमा लक्षात घेऊन, पंतप्रधानपद ग्रहण केल्यानंतर मोरारजीभाईंनी स्वतः होऊन कांतीला अन्यत्र रहायला सांगायला हवे होते. त्याचप्रमाणे परदेश–प्रवासामध्ये वैयक्तिक सहाय्यक म्हणून त्याला नेण्याचेही टाळणे योग्य झाले असते. त्याऐवजी आपल्या वयाचे कारण पुढे करून मोरारजीभाईंनी कांतीच्या निवासी–नेमणुकीचे समर्थन केले. त्यानंतर चरणसिगांनी 'कांतीच्या व्यवहारासंबंधी आपल्या कानांवर काय आलेले आहे' हे कळविल्यावर, मोरारजीभाईंनी, 'तुमच्या कुटुंबियांसंबंधी माझ्याकडेही तक्रारी आलेल्या आहेत,' असे उत्तर देण्याऐवजी, 'गृहमंत्री म्हणून तुम्हाला योग्य वाटेल ती चौकशी करा,' असे सुनावले असते तर या प्रकरणात मोरारजीभाईंचे हात स्वच्छ आहेत याचीही खात्री पटली असती आणि त्याचबरोबर विरोधकांच्या हातात आपण होऊन कोलित देण्याची चूकही घडली नसती.

संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर इंदिरा काँग्रेसने यासंबंधीचा मोरारजी–चरणसिग पत्रव्यवहार सादर करण्याची मागणी केली. त्या वेळीही मोरारजीभाईंनी अशीच हटवादी भूमिका घेतली. नंतर त्यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांना तो पत्रव्यवहार दाखविला. ती चारही पत्रे वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेली असताना, संसदेपुढे ठेवण्याने काहीच बिघडण्यासारखे नव्हते. राज्यसभेने पंधरा सदस्यांची चौकशी-समिती नेमण्याचा ठराव मंजूर केल्यानंतर, मोरारजीभाई कांती–प्रकरणासंबंधीचे लेखी आरोप सरन्यायाधीशांकडे तपासणीसाठी पाठवायला तयार झाले. इंदिरा काँग्रेसने चौकशी समितीची शिफारस करणारा ठराव मांडताच, मोरारजीभाईंनी ही तयारी दर्शविली असती तर त्या ठरावाला पाठिंबा द्यावा की नाही असा स्वर्णसिग काँग्रेसपुढे पेच पडला असता आणि कदाचित तो ठराव मंजूरही झाला नसता

सत्ताकारणाच्या डावांमध्ये तरबेज रमलेली मंडळी पुत्रप्रेमापायी विवेकशून्य होतात की काय असाच प्रश्न पडतो. संजयला आपला राजकीय वारस करण्याचा ध्यास इंदिरा गांधींनी घेतला नसता तर आणीबाणी त्यांच्या एवढ्या विरोधात गेली नसती. कांतीला संरक्षण देण्याच्या आग्रहापायी मोरारजीभाई स्वच्छ आणि शुद्ध जीवनाची प्रतिमा गमावून बसत आहेत. सुरेशकुमारचे रंगढंग आणि घटस्फोटाचा अर्ज जगजीवनबाबूंना, पुढे जाण्याची संधी निर्माण झालेली असताना बचावाचा पवित्रा घ्यायला लावीत आहे. चरणसिगांना मित्रप्रेम नडत आहे. राजनारायण यांच्या विदुषकी चाळ्यांना आणि बेताल बडबडीला त्यांनी वेळीच आवर घातला असता तर आज त्यांच्यावर एकाकी पडण्याची जी पाळी आलेली आहे ती टाळता आली असती.

एकूण काय तर सगळा आनंदीआनंद आहे.

तरीही आचारसंहिता हवीच.

कारण 'पार्टी' म्हटली की वग आलाच. मागच्या 'पार्टी'ने नव्हता का अनुशासन हा वग सादर केला? प्रेक्षक तेच असले म्हणून काय झाले, प्रत्येक 'पार्टी'पाशी वग असावाच लागतो.

'बोर्ड'वर येण्यापूर्वीच्या आपल्या आश्वासनांचा स्वतःला आणि प्रेक्षकांना विसर पाडण्यासाठी. □

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# चलो फिरसे मुस्कुराए
# चलो फिरसे दीप जलाए
# जो बिसर गये हैं रास्ते
# उन्हीसे फिर हम जाए

## □ फैज अहमद फैज यांची मुंबई–भेट

देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध भाषिक आणि विविध धर्मी लोकांचं प्रमाण अन्य कोणत्याही शहरापेक्षा मुंबईत खचितच अधिक आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट समाजाचा असा कार्यक्रम असला तरी पुरेशा संख्येने मंडळी सहज जमतात नि एखाद्या संमेलनाच स्वरूप आलेला तो कार्यक्रम उपस्थितांना एक आगळा आनंद देऊन जातो.

याची प्रचिती आली ती पाकिस्तानातील प्रसिद्ध उर्दू कवी फैज अहमद फैज यांच्या मुंबईतील कार्यक्रमाच्या वेळी. श्री फैज अहमद हे उर्दूतील एक अग्रगण्य कवी आहेत. जीवनातला महत्त्वाचा काळ भारतात गेल्यामुळे भारताविषयी त्यांना स्वाभाविक ओढ आहे. भारताबरोबर अधिक घनिष्ट संबंध असावेत व युद्धे टाळण्यात यावीत, अशी मते बाळगणारे जे काही पाकिस्तानी नेते आहेत त्यांपैकीच एक म्हणजे श्री. फैज अहमद. फाळणीनंतर भारतात यापूर्वी ते एक–दोन वेळा आले होते. अलीकडेच आपले परराष्ट्र-मंत्री श्री. वाजपेयी यांनी इस्लामाबादेस भेट दिली होती त्या वेळी श्री. फैज अहमद यांनी मुद्दाम त्यांची भेट घेतली. उभय देशांत सांस्कृतिक देवाण–घेवाण व्हावी ही आपली इच्छा त्यांनी परराष्ट्र-मंत्र्यांजवळ बोलून दाखविली. या भारतमित्र कवीच्या इच्छेला प्रतिसाद म्हणून वाजपेयींनी त्यांना "शाही पाहुणे" म्हणून विशेष निमंत्रण दिलं. त्या सरकारी निमंत्रणानुसार श्री. फैज अहमद सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. हैद्राबाद, बनारस पाठोपाठ मुंबईतही त्यांच्या चाहत्यांनी त्यांचं जंगी स्वागत केलं.

श्री. फैज अहमद यांच्या या स्वागतामागे उर्दू वाङ्मयात त्यांनी मिळविलेलं स्थान आणि त्यांची एकूण साहित्यिक कामगिरी, ही मुख्य कारणे आहेत.

सदुसष्ट वर्षीय श्री. फैज अहमद यांचा जन्म सियालकोटचा. लाहोर, सियालकोट आणि अमृतसर परिसरात बालपण गेल्यानंतर लाहोरमधेच त्यांनी इंग्लिश विषय घेऊन एम्. ए. ची पदवी मिळविली. काही काळ प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी रेडिओ पाकिस्तानमधे नोकरी स्वीकारली. १९५१ च्या सुमारास तत्कालीन पाक राज्यकर्त्यांविरुद्धचा उठाव म्हणून गाजलेल्या "रावळपिंडी कटप्रकरणात" फैज अहमद सामील झाल्यामुळे पाच–सहा वर्षे त्यांना कारावासात काढावी लागली. पुढे इम्रोम या प्रसिद्ध वृत्तपत्राचे संपादक म्हणून काही काळ त्यांनी जबाबदारी संभाळली. काही काळ कामगार चळवळीतही भाग घेतला व त्यापायी अयुबखानच्या राजवटीत त्यांना दोन वेळा तुरुंगवास घडला. याच काळात साम्यवादी विचारसरणीकडे फैज अहमद आकर्षित झाले होते; परंतु काही वर्षांतच त्या विचारसरणीचा फोलपणा लक्षात आल्यामुळे ते काहीसे निराश झाले.

इतकं वैशिष्टयपूर्ण आणि समृद्ध जीवन जगणारे असे कवी उर्दूत फारच थोडे असतील. "दस्तसबा" (सकाळी दारावर पडलेली थाप) या नावाचा त्यांचा काव्यसंग्रह सुप्रसिद्ध आहे. याशिवाय "नक्ष–ए–फिर्यादी" (फिर्यादीची कैफियत) आणि तुरुंगात लिहिलेला "जिंदानामा" हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह. दोन–दोन स्वतंत्र ओळींच्या गझला लिहिण्याऐवजी "नज्मा" (भावकविता) लिहिणं फैज अहमद यांनी अधिक पसंत केलं आहे.

स्त्री–पुरुषांतील उत्कट प्रेम आणि देशभक्ती हे फैज अहमद यांचे मुख्य काव्यविषय ! स्त्रीच्या सौंदर्याचं किंवा प्रेमलीलांचं वर्णन ज्या उत्कटतेने फैज अहमद सादर करतात तीच उत्कटता त्यांच्या जोशपूर्ण अशा देशभक्तीपर कवितांमधे आढळते. इतकंच नव्हे तर स्त्री–सौंदर्याचं वर्णन करताना ते ज्या प्रतिमा वापरतात त्यांचाच वापर करून ते देशाविषयीची निष्ठा व्यक्त करतात. अकृत्रिम, सहज सुंदर भाषा हे फैज अहमद यांच्या काव्याचं आगळं एक वैशिष्टय. गंध किंवा शब्दप्रतिमांपेक्षा स्पर्शप्रतिमा वापरून कविता फुलविण्यात फैज अहमद यांचा हातखंडा आहे.

फैज अहमद यांच्या कवितेतील अशा अनेक काव्यगुणांची, वैशिष्टयांची कल्पना मुंबईतील त्यांच्या काव्यवाचन–कार्यक्रमांच्या वेळी आली. महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीच्या वतीने दि. २५ ऑगस्टला त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी राज्याचे अर्थ व शिष्टाचार राज्यमंत्री डॉ. इशाक जिमखानवाला अध्यक्षस्थानी होते. सत्काराला उत्तर देतांना फैज अहमद म्हणाले की, भारत–पाकिस्तान या दोन देशांत सांस्कृतिक देवाण–घेवाण सुरू झाली तर कधी कधी अकारण निर्माण होणारा वैरभाव नाहीसा होऊ शकेल. या वेळी त्यांनी ज्या कविता वाचल्या त्यापैकी एका उल्लेखनीय कवितेत ते म्हणतात–

चलो फिरसे मुस्कुराए
चलो फिरसे दीप जलाए
जो बिसर गये हैं रास्ते
उन्हीसे फिर हम जाए

एका कवितेत जीवनातील वेदना, यातना समाजातील दु:खे यांची कल्पना आल्यानंतर आता पूर्वीसारखं प्रेमाराधन करता येणार नाही हे त्यांनी मोठ्या सूचकतेनं स्पष्ट केलं आहे.

पाकिस्तानी लेखक भारतीय लेखकाइतकाच स्वतंत्र आहे, असं एका मुलाखतीत त्यांनी सांगितले आहे; पण गेल्या तीस वर्षात अनेक लष्करशहांच्या राजवटीत पाकिस्तानी नागरिकांनी मूलभूत हक्क गमावले होते हे उघड गुपित आहे. मनात खोलवर दडलेला तो सल व्यक्त करताना एका कवितेत फैज अहमद म्हणतात—

जबां पे मुहर लगी है तो क्या कि रख दी है

हरेक हलकई जंजीरमें जबां मैं ने.

माझं तोंड कदाचित बंद करता येईलही, पण त्याचा परिणाम होणार नाही. कारण माझ्या शृंखलेच्या प्रत्येक कडीमध्ये माझी एकेक जीभ आहे, असा आशय या ओळी व्यक्त करतात.

जीवनातील विविध अनुभवांचं सुरेख प्रतिबिंब ज्यांच्या काव्यात आहे त्या फैज अहमद फैज यांचा पंजाबी मित्रमंडळ, गांधी स्मारक संशोधन केंद्र इ. अनेक संस्थांच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला. दि. २८ ला गांधी स्मारक संशोधन केंद्रात त्यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाला ज्येष्ठ भारतीय उर्दू कवी अली सरदार जाफरी हेही उपस्थित होते. प्रारंभी श्री. युसुफ नाझीम यांनी फैज अहमद यांचं एक शब्दचित्ररेखाटन सादर केलं. संस्थेचे अध्यक्ष डॉ. ए. एम्. आय्. दळवी यांच्या भाषणानंतर सत्काराला उत्तर देताना फैज अहमद यांनी भाषा–भाषांमधील अंतर कमी करण्याची आवश्यकता प्रतिपादिली. या कार्यक्रमाला उर्दू साहित्यिक, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला हजर असलेले ज्येष्ठ मराठी कवी वा. रा. कांत यांनी फैज अहमद यांचं वेगळेपण आणि त्यांचे विचार यांच्याबद्दल मौलिक माहिती सांगितली. ते म्हणाले की, 'फैज अहमद जात्याच उदारमतवादी आणि मानवतावादी आहेत. 'सारे जहाँसे अच्छा...' या एके काळी गाजलेल्या गीताचे कवी सर मोहमद इक्बाल यांच्या दृष्टिकोनातून भारत हा त्यांचा तात्पुरता निवारा होता. भारताविषयी त्यांना प्रेम होते, पण निष्ठा नव्हती. फैज अहमद यांना मात्र स्वत:ला मूळचे भारतीय म्हणवून घेण्यात अभिमान वाटतो. त्यांच्या विवेकपूर्ण विचारांमुळे धर्म-भेदांना त्यांनी कधीच वाव दिला नाही.'

दिल्लीपासून हैद्राबादपर्यंत फैज अहमद यांचं स्वागत झालं ते त्यांच्या या दृष्टिकोनाबद्दल आदर व्यक्त करण्यासाठीच! □

## □ कुमारस्वामींची जन्मशताब्दी

कलासंशोधन आणि समीक्षेच्या क्षेत्रात वावरणाऱ्यांमध्ये डॉ. आनंद कुमारस्वामी यांचं नाव ठाऊक नसणारा इसम विरळाच.

डॉ. कुमारस्वामी हे मूळचे इंग्लंडचे. कलासंशोधनाची आवड असलेला, नव्हे, त्या वेडानं झपाटलेला हा युवक बरीच वर्षे बोस्टनच्या वस्तुसंग्रहालयात संशोधक होता. विशेष म्हणजे कलासंशोधक म्हणून ते गाजले ते त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात. मूळचे ते भूगर्भशास्त्रज्ञ होते. सिलोनमध्ये असताना एका प्राचीन नगरीतील बौद्धकालीन शिल्पकलेच्या दर्शनानं ते कमालीचे प्रभावित झाले. भारतीय शिल्पकलेच्या अभ्यासासाठी पुढे त्यांनी आपले सर्व उर्वरित आयुष्य वेचले.

भारतातील ठिकठिकाणच्या प्राचीन शिल्पाकृतींचा डॉ. कुमारस्वामींइतका सखोल अभ्यास क्वचितच एखाद्या समीक्षकानं केला असेल. कुमारस्वामींचे कलासमीक्षेचे स्वत:चे असे काही सिद्धान्त होते. 'कोणतीही कला कलाकार आणि ज्याच्यासाठी कलानिर्मिती होते तो रसिक या उभयतांच्या भूमिकेतून विचार केल्यावरच पूर्णपणे आकलन होऊ शकते,' असं त्यांचं मत होतं. विशेषत: भारतीय कला ही तर कल्पनेनं समजण्यासारखी गोष्ट अजिबात नाही. भारतीय कला ही एक अनुभविण्याची गोष्ट आहे, असंही ते म्हणत. भारतीय कलेतील संवेदनक्षमतेबद्दल ते म्हणतात की, ही संवेदनक्षमता दैवी किंवा उदात्त स्वरूपाची आहे. भारतीय संगीत हे मानवी मनाला व्यक्त करीत असतानाच दुसऱ्याच्या भावनांना प्रभावी आवाहन करू शकतं.

शिवनृत्याच्या भारतीय शिल्पाबद्दल ते म्हणतात — 'शिवशंकराचं नृत्य हे जीवन आणि मरण यांचं संयत आणि सूचक प्रतीक आहे. नृत्याच्या विविध आकृत्यांमधून कृती, स्थिती आणि संहार या जीवनचक्राचाच बोध होतो.' भारतीय कलेबद्दलच्या डॉ. आनंदकुमारस्वामी यांच्या या दृष्टिकोनाची यथार्थ कल्पना देणारा एक देखणा कार्यक्रम नुकताच कुमारस्वामी सभागृहात पार पडला.

कुमारस्वामी यांच्या जन्मशताब्दीचं हे वर्ष आहे. त्या निमित्ताने 'कुमारस्वामी स्मारक व्याख्यान निधी'च्या विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमाला मुंबईतील कलारसिकांची प्रचंड गर्दी लोटली होती. अनेकांना जागेअभावी उभ्याउभ्याच कार्यक्रम पहावा लागला.

या कार्यक्रमात सर्व प्रथम 'विकलो'चे कार्यकारी संपादक माधव कामथ यांचं भाषण झालं. त्यानंतर डॉ कुमारस्वामींचे एक शिष्य श्री. मुल्कराज आनंद यांनी कुमारस्वामींच्या जीवनाची ओळख करून दिली. शेवटी बहुमाध्यमी स्वरूपात (स्लाइड प्रोजेक्टर व सिनेप्रोजेक्टरच्या सहाय्याने) एका आडव्या पडद्यावर एकाच वेळी तीन चित्रदृश्ये दाखवून कुमारस्वामींचा भारतीय कलेविषयीचा दृष्टिकोन समजावून सांगण्यात आला. या चित्रपटाचं संगीत तर श्रवणीय होतंच, पण श्री. सिद्धार्थ काक यांचं निवेदनही विलक्षण प्रभावी वाटलं. मूळचे कुमारस्वामींचे शब्द त्यांनी तितक्याच प्रभावीपणे उच्चारले.

ग्रिंडलेज बँकेच्या सौजन्याने सादर केला गेलेला हा कार्यक्रम मिनिएचर चित्रे, बौद्धकालीन शिल्पे, हिंदूंची शिल्पचित्रे आणि मोगलकालीन कलाकुसर यांचं यथार्थ दर्शन घडवून आणणारा होता. हिंदुस्थानी शिल्पे अभ्यासण्यासाठी धर्म, देश आणि नाव बदलणाऱ्या या हाडाच्या कलासंशोधकाच्या जन्मशताब्दीनिमित्त झालेला हा कार्यक्रम कलारसिकांना खचितच अविस्मरणीय वाटला असेल. □

## □ फेरीवाल्यांच्या समस्या

मुंबईच्या मोठमोठ्या रस्त्यांचे पदपथ किंवा गल्लीबोळांचे कोपरे अशा ठिकाणांवर पुढ्यात छत्र्या, कपडे, खेळणी इ. पासून अंगठ्या, हातरुमाल, फौंटन पेन इ. पर्यंत अनेकविध वस्तूंचे पसारे घेऊन बसणारे फेरीवाले मुंबईत येणाऱ्या प्रवाशाला देखील अपरिचित नसावेत. फोर्ट भागातील दादाभाई नौरोजी रोड, गिरगाव,

भुलेश्वर, दादरचा रानडे रोड, कुर्ला, पार्ला, बोरिवली इ. अनेक भागांत फेरीवाल्यांच्या पसाऱ्याचं हे दृश्य आता कॉमन झालं आहे.

चढत्या भावानं सांगितलेली वस्तू कल्पनेपेक्षा खूपच स्वस्तात देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या ह्या फेरीवाल्यांची संख्या बृहन्मुंबईत एकूण लाख–सव्वा लाख इतकी आहे. यात जवळ जवळ २५००० फेरीवाले चारचाकी हातगाड्यांवर माल विकणारे आहेत. भाजी विकणाऱ्या फेरीवाल्यांची संख्याही मोठी आहे. सुमारे २०००० पेक्षा जास्त महिलांचाही या फेरीवाल्यांमध्ये समावेश होतो. सरकारी भाषेतच सांगायचं तर हे सर्व फेरीवाले अल्प उत्पन्नगटात मोडणारे आहेत. वस्तूच्या स्वरूपानुसार या फेरीवाल्यांना दिवसाकाठी प्रत्येकी १० ते २५ रु. उत्पन्न मिळतं.

रस्त्यांचे पदपथ अडवून अनधिकृतपणे उपजीविकेची सोय करणाऱ्या या फेरीवाल्यांबद्दल अनेकांच्या अनेक तक्रारी आहेत. पदपथ अडविल्यामुळे धावपळ करणाऱ्या मुंबईकरांना अनेकदा या निराळ्याच अडथळ्यांच्या शर्यतीला तोंड द्यावं लागतं. दादर भागात तर या फेरीवाल्यांची इतकी गर्दी असते की, तिथल्या पदपथावरून चालताना कुणालाही 'जपून टाक पाऊल जरा...' या ओळीची आठवण यावी. शिवाय ह्या फेरीवाल्यांजवळच्या माल चांगल्या दर्जाचा नसतो, बरेचदा ते ग्राहकाला व्यवस्थित फसवितात इ. अनेक तक्रारी सामान्य नागरिकांच्या आहेत.

पण मोठ्या संख्येत असलेल्या फेरीवाल्यांच्याही काही विशिष्ट समस्या आहेत. या फेरीवाल्यांच्या संघटनेची पहिली तक्रार मुंबई महापालिकेबद्दल आहे. या फेरीवाल्यांपैकी जवळ जवळ ८०% अनधिकृतपणे व्यवसाय करतात. महापालिकेच्या नियमाप्रमाणे अशा फेरीवाल्यांचा माल महापालिकेची गस्तगाडी जप्त करते आणि विशिष्ट दंड आणि अनामत भरल्यानंतरच त्यांना माल परत मिळू शकतो. पण फेरीवाल्यांच्या म्हणण्यानुसार ह्या दंडाची रक्कम अव्वाच्या सव्वा आकारली जाते. शिवाय माल परत मिळतो तेव्हा त्यातला काही भाग नेहमीच गडप झालेला असतो. महापालिकेचे कर्मचारी फेरीवाल्यांच्या वस्तू निष्काळजीपणे ठेवतात, त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होतं.

हे सगळं टळावं म्हणून फेरीवाल्यांना महापालिकेकडून व्यवसाय-परवाने हवे आहेत. गेली कित्येक वर्षं त्यांची ही मागणी मान्य झालेली नाही. असे परवाने न मिळाल्यामुळे या फेरीवाल्यांना एक तर कायदेशीर कारवाईला नाही तर बेकायदेशीर लाचलुचपतीला तोंड द्यावं लागतं. कायदेशीर कारवाईत नुकसानी जास्त असल्यामुळे साहजिकच पोलीस किंवा अधिकाऱ्यांच्या हातावर चिरीमिरी देणं फेरीवाले पसंत करतात.

मुंबईत फेरीवाल्यांना सर्वांमिळून एकूण ३ लाख रुपये 'चिरिमिरी' द्यावी लागते हे ऐकून कोणीही थक्क होईल. अर्थात हा आरोप आहे फेरीवाला संघटनेचा! त्यांच्याच एका नेत्याच्या म्हणण्यानुसार काही काही फेरीवाल्यांना तर महिन्यातून दोन वेळा हप्ता द्यावा लागतो. शिवाय पोलिस किंवा अधिकारी जाता-येता फेरीवाल्याच्या पसाऱ्यातला माल 'उचलतात' तो वेगळाच! आणीबाणीच्या काळात तर दरमहा २०० रु एवढा हप्त्याचा भाव वाढला होता, असंही एका नेत्यानं सांगितलं. हे प्रकार बंद व्हावेत म्हणून ह्या संघटनेनं महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, सरकारी अधिकारी इ. अनेकांकडे शेकडो तक्रारी नेल्या आहेत; पण अद्याप परिणाम शून्य! आणि लाच द्यायची तयारी नसेल तर गस्तगाडी येताच धावपळीची तयारी ठेवावी लागते. तेव्हा महापालिका नि पोलिस यांच्या कोंडीत आम्ही सापडलो आहोत, असं ह्या फेरीवाल्यांचं म्हणणं आहे.

फेरीवाल्यांचे सर्वच आरोप किंवा तक्रारी १००% खऱ्या असतील, असं कोणीच म्हणणार नाही; पण म्हणून इतक्या मोठ्या प्रमाणावर चालणारा आणि बऱ्याच ठिकाणी 'चालू दिलेला' हा व्यवसाय अनधिकृत आहे, म्हणून तक्रारी दुर्लक्षणीय आहेत असंही म्हणता येणार नाही. मध्यंतरी दिल्लीत त्यांनी अमलात आणलेल्या फेरीवाल्यांच्या राखीव क्षेत्राची (झोन्स) कल्पना पुढे आली होती. फेरीवाल्यांच्या संघटनेलाही ही योजना राबविता येईल. त्यामुळे नागरिकांचा त्रास तर कमी होईलच, पण फेरीवाल्यांनाही व्यवसायासाठी हक्काची जागा मिळेल. अनधिकृत झोपड्या पाडल्यानंतर विस्थापितांचं सरकारीरित्या पुनर्वसन केलं जातं. फेरीवाल्यांनाही तोच न्याय का मिळू नये?

हे सगळं लिहिण्याचं कारण दि. १६ ऑगस्टला या फेरीवाल्यांच्या संघटनेचा एक मोठा मोर्चा सचिवालयावर नेण्यात आला होता. नव्या मंत्रिमंडळात त्यांचे नेते जगन्नाथ जाधव हेही आहेत, तेव्हा आता नव्या सरकारने तरी आपल्या समस्या विचारात घ्याव्यात, अशी त्यांची मागणी होती. त्यानंतर दि. २५ ला मुख्यमंत्र्यांनी त्यांना चर्चेसाठी पाचारण केलं होतं. या चर्चेच्या वेळी पालिका आयुक्त, पोलीसआयुक्त, काही मंत्री आणि फेरीवाला संघटनेचे श्री. शरद राव, सतीश वगळ इत्यादी नेते उपस्थित होते. फेरीवाल्यांना सध्या प्रायोगिक स्वरूपात फोर्ट आणि गोरेगाव या भागात जागा ठरवून दिल्या जाणार आहेत. त्यानंतर असा प्रयोग मुंबईभर यशस्वी होईल काय, याचा अंदाज घेण्यात येईल. फेरीवाल्यांना परवान्याऐवजी आठ आण्यांची पावती देऊन अधिकृत करून घेण्यात येण्याचीही शक्यता आहे.

पोलीस व अधिकारी लाच घेणार नाहीत याकडे आपण जातीनं लक्ष घालू, असं आश्वासन स्वतः मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे, असंही समजलं. नव्या शासनानं निदान सर्व संबंधितांना एकत्र बोलावून विचार केला हेही काही कमी नाही! □

# घटनादुरुस्ती
## आता लोकसभा काय करणार?

वा. दा. रानडे

आणीबाणीत बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीने लोकशाहीची पायमल्ली करणाऱ्या तरतुदी इंदिरा गांधींनी घटनेत समाविष्ट केल्या होत्या त्या रद्द करून लोकशाही हक्कांची पुन्हा प्रस्थापना करणारे चव्वेचाळिसावी घटनादुरुस्ती बिल लोकसभेत बिनविरोध आणि राज्यसभेत पाच दुरुस्त्यांसह मंजूर झाले. बिलात राज्यसभेने जे बदल केले त्यात सार्वमतासंबंधीचे कलम रद्द केले हा महत्त्वाचा बदल आहे. दुरुस्त बिल आता हिवाळी अधिवेशनात लोकसभेत चर्चेस येईल त्या वेळी राज्यसभेने नामंजूर केलेल्या पाच कलमांबद्दल लोकसभा पुन्हा आग्रह धरील का? घटनादुरुस्ती बिल प्रत्येक सभागृहात दोनतृतियांश बहुमताने पास झाले पाहिजे अशी घटनेत तरतूद आहे; पण बिलाच्या सर्व कलमांबद्दल दोन्ही गृहांत एकमत झाले नाही तर वादग्रस्त कलमे रद्द समजावयाची की दोन्ही गृहांची संयुक्त बैठक घेऊन दोनतृतियांश बहुमताने निर्णय घ्यावयाचा यासंबंधी घटनेत काहीही उल्लेख नाही. आपल्या घटनेच्या इतिहासात असा प्रसंगच आतापर्यंत आलेला नाही.

सार्वमताची तरतूद हे या घटनादुरुस्तीचे एक महत्त्वाचे वैशिष्टय होते. घटनेत मूलभूत स्वरूपाचे बदल करावयाचे असतील तर त्या दुरुस्त्यांना राष्ट्रीय सार्वमत घेऊन मंजुरी घेतली पाहिजे आणि या सार्वमतात दुरुस्तीच्या बाजूने किमान ५१ टक्के मते मिळाली पाहिजेत अशी तरतूद या बिलात होती. मूलभूत बदल कशाला म्हणावयाचे याचीही व्याख्या त्यात केली होती. प्रजासत्ताकाचे जातिधर्मनिरपेक्ष व लोकशाही स्वरूप बदलणे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांत बदल करणे, प्रौढ मताधिकारावर आधारलेल्या खुल्या निवडणुकांच्या पद्धतीत बदल करणे, न्यायालयांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणारे बदल करणे हे मूलभूत बदल असून सार्वमताच्या मंजुरीशिवाय ते करता येणार नाहीत, असे म्हटले होते. घटनेत कोणत्याही स्वरूपाचे बदल करण्याचा संसदेला अधिकार आहे अशी इंदिरा गांधींची भूमिका होती, ती या दुरुस्तीने फेटाळण्यात आली होती. घटनेतील मूलभूत बदलांना केवळ संसदेच्या दोन्ही गृहांची मंजुरी पुरेशी नाही. सार्वमताच्या रूपाने जनतेची ही मंजुरी मिळवायला हवी, असा या दुरुस्तीचा आशय होता. अनेक देशांच्या घटनांत अशी सार्वमताची तरतूद आहे. तेव्हा या दुरुस्तीत तत्त्वतः आक्षेप घेण्यासारखे काही नव्हते.

पण विरोधकांची यासंबंधीची भूमिकाही विचारात घेतली पाहिजे. लोकसभेत व राज्यसभेत दोन्ही काँग्रेस पक्षांनी या दुरुस्तीस विरोध केला. काही वृत्तपत्रांनीही त्यातील धोक्याकडे लक्ष वेधले. राज्यसभेने तर ही दुरुस्ती फेटाळूनच लावली. सार्वमताचा अधिकार योग्य रीतीने बजावण्याइतका आमचा मतदार सुजाण व जागरूक आहे का? जवळजवळ सत्तर टक्के मतदार अशिक्षित आहेत. त्यांना वाचता येत नसल्याने सार्वत्रिक निवडणुकांत उमेदवारांच्या नावांपुढे खुणेचे चित्र छापावे लागते. सार्वमतासाठी टाकलेल्या विषयातील दोन किंवा अधिक पर्यायांनाही अशीच चिन्हे द्यावी लागतील. या पर्यायांचा अर्थ नीट समजून घेऊन मतदान होईल का? याबद्दल आक्षेपकांना शंका वाटते. प्रचाराच्या जोरावर मतदारांची दिशाभूल केली जाण्याचा यात धोका असून अशा सार्वमतातून जनमताचा खरा कौल कळणार नाही असे त्यांचे म्हणणे. या शंका अनाठायी म्हणता येणार नाहीत. गोव्यातील सार्वमताचा अनुभव आपल्यापुढे आहेच. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने गोव्यातील सार्वत्रिक निवडणुका जिंकल्या; पण सार्वमत तो हरला. महाराष्ट्रात सामील होण्यास गोव्यातील बहुसंख्य जनतेचा विरोध होता असे म्हणता येणार नाही. पण प्रश्न त्यांच्यापुढे योग्य रीतीने मांडला गेला नाही आणि कौल विरुद्ध गेला. सार्वमत घेणे तत्त्वतः चुकीचे नाही; पण त्यासाठी मतदारांचे योग्य शिक्षण करायला हवे. दुसरा मुद्दा किमान ५१ टक्के मतांनी निर्णय घेण्याचा. मूलभूत स्वरूपाच्या बदलांवर एवढ्या अल्प बहुमताने निर्णय घेणे योग्य नाही. अशा बदलास भरीव बहुमताचा पाठिंबा हवा. कोणत्याही घटनादुरुस्तीस संसदेच्या दोन्ही गृहांतील दोनतृतियांश बहुमत आवश्यक मानले जाते तर सार्वमताच्या बाबतीतही दोनतृतियांश बहुमताची अट ठेवण्यात आली पाहिजे. लोकांना खरोखरच बदल हवा असेल तर एवढ्या बहुमताने ते निश्चित कौल देतील.

यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे घटनेत मूलभूत स्वरूपाचे बदल सार्वमताने तरी करण्याची मोकळीक ठेवावी का? घटनेचे अपरिवर्तनीय भाग आणि परिवर्तनीय भाग असे दोन भाग करण्यात यावे. अपरिवर्तनीय भाग कोणत्याही परिस्थितीत सार्वमतानेसुद्धा बदलण्यात येऊ नये. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या उद्दिष्टावर आपली घटना आधारलेली आहे. त्यात बदल करणे म्हणजे स्वातंत्र्यलढ्यापासून आपण उराशी बाळगलेल्या मूल्यांवरच तो आघात आहे असे म्हणावे लागेल. अशा बदलास कोणत्याही परिस्थितीत वाव ठेवता कामा नये.

सशस्त्र बंडाचा धोका किंवा प्रत्यक्ष बंड झाल्यास अंतर्गत आणीबाणी पुकारण्याची तरतूद नव्या घटनादुरुस्तीत आहे. पूर्वीच्या काळातील अंतर्गत अशांतता (इंटर्नल डिस्टर्बन्स) या शब्दाऐवजी सशस्त्र बंड हे शब्द वापरले आहेत; पण ते पूर्वीच्या शब्दांइतकेच संदिग्ध आहेत. त्यांची व्याख्या किंवा अर्थ अधिक स्पष्ट करायला हवा. यासंबंधात

काही राजकीय समीक्षक व लेखकांनी केलेली टीका विचारात घेतली पाहिजे. नक्षलवाद्यांनी केलेला सशस्त्र उठाव हे सशस्त्र बंड म्हणता येईल का? आणीबाणी न पुकारता नेहमीच्या कायद्यानुसार कारवाई करून या उठावाचा बंदोबस्त सरकारने केला तेव्हा अशा बंडाच्या किंवा उठावाच्या बंदोबस्तासाठी आणीबाणी पुकारण्याची आवश्यकता आहे काय? बंडाची व्याप्ती आणि तीव्रता कोणत्या मर्यादेपर्यंत वाढली म्हणजे आणीबाणी पुकारणे समर्थनीय ठरेल? आपल्या विरोधकांना चिरडण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या कलमांचा दुरुपयोग केला, कायद्याने प्रस्थापित झालेले सरकार पाडण्यासाठी हिंसाचारी चळवळी केल्या जात आहेत असा त्यांचा आरोप होता. सशस्त्र बंडाचा तरी अर्थ दुसरा काय होतो? आपल्या विरोधकांना दडपण्यासाठी एखादे भावी सरकार या कलमाचा दुरुपयोग करणार नाही याची काय शाश्वती? अशी शंका कोणाच्या मनात येईल; पण नव्या दुरुस्तीने हे इतके सोपे राहिलेले नाही. आणीबाणीसंबंधी आपला निर्णय मंत्रिमंडळाने राष्ट्रपतींना लेखी कळवावा लागेल. आणीबाणी पुकारल्यानंतर एक महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही गृहांची दोनतृतियांश बहुमताची संमती त्यास घ्यावी लागेल. जाहीरनाम्याची मुदत सहा महिनेच राहील. त्यानंतर मुदतवाढीसाठी पुनः संसदेची संमती घ्यावी लागेल. याप्रमाणे आणीबाणीच्या अधिकाराचा दुरुपयोग टाळण्यासाठी जास्तीत जास्त दक्षता घेतली असली तरीही सशस्त्र बंडाचा अर्थ अधिक स्पष्ट करण्यात यावा आणि ज्या भागात बंड असेल तेवढ्या भागापुरतीच आणीबाणी जाहीर करण्याचे अधिकार सरकारला असावे. राज्यसभेतील चर्चेत हे कलम अधिक स्पष्ट केले जाईल अशी अपेक्षा होती; पण ते तसेच मंजूर झाले.

सार्वमताचे कलम रद्द करण्याशिवाय राज्यसभेने आणखी चार बदल बिलात केले. शिक्षण व वन हे विषय समाईक यादीतून काढून केवळ राज्यांकडे सोपविण्याची दुरुस्ती फेटाळली. धर्मनिरपेक्षता व समाजवाद यांच्या व्याख्या करणारी दुरुस्ती नामंजूर केली. प्रशासकीय लवादमंडळे रद्द करावीत ही दुरुस्ती अमान्य केली आणि मूलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्त्वे श्रेष्ठ ठरविणारी दुरुस्ती रद्द करण्यास नकार दिला. यांपैकी शिक्षण व वन हे विषय समाईक यादीतून काढून राज्यांकडे सोपविण्याची मूळ बिलातील कल्पना रद्द झाली हे योग्यच झाले. या दोन्ही विषयांसंबंधीच्या धोरणात त्यामुळे एकसूत्रीपणा राहील; पण बाकीच्या दोन दुरुस्त्यांबद्दल लोकराज्यसभेने आग्रह धरायला हवा.

घटनादुरुस्तीच्या प्रश्नावर लोकसभा आणि राज्यसभा यांच्यातील संघर्षाचे प्रसंग टाळण्यासाठी काय उपाय योजायला हवेत याचाही विचार व्हावा. राज्यसभेची काही आवश्यकता नाही; ती रद्द करावी असे माझे स्वतःचे मत आहे; पण लोकसभेवर जे निवडून येत नाहीत त्यांची सोय राज्यसभेत करता येत असल्याने राज्यसभा रद्द करण्याची सूचना राजकीय पक्ष मान्य करतील असे वाटत नाही. दुसरे दोन पर्याय म्हणजे एक तर लोकसभेबरोबरच राज्यसभेची निवडणूक व्हावी म्हणजे राजकीय मतप्रवाहांना दोन्ही गृहांत सारख्याच प्रमाणात प्रतिनिधित्व मिळेल व संघर्षाचे प्रसंग येणार नाहीत किंवा अर्थविषयक बिलाप्रमाणेच घटनादुरुस्ती बिलाच्या बाबतीतही राज्यसभेचे अधिकार मर्यादित करण्यात यावे. घटनादुरुस्ती बिलात राज्यसभेने दुरुस्त्या जरूर सुचवाव्यात. लोकसभेने त्यांचा विचार करावा आणि त्यावर दोनतृतियांश बहुमताने अंतिम निर्णय घ्यावा. राज्यसभेची अशी पुनर्रचना करावयाची किंवा अधिकार कमी करावयाचे म्हणजे त्यासाठी घटनादुरुस्ती बिल मांडावे लागणार. तेही राज्यसभेत दोनतृतियांश बहुमताने मंजूर व्हावयास हवे. आपले अधिकार मर्यादित करण्यात राज्यसभेचे सभासद एवढ्या बहुमताने मान्यता देतील असे वाटत नाही याचाच अर्थ अशी दुरुस्ती होणे कठीण आहे. तेव्हा बिल संपूर्णपणे फेटाळले जाण्यापेक्षा राज्यसभेच्या दुरुस्त्यांसह ते मंजूर करावे असा प्रयत्न जनता पक्षाचे नेते करण्याचा संभव आहे; पण राज्यसभेबाबतची दुरुस्ती लागलीच शक्य नसली तरी दोन गृहांतील संघर्षाचे मूळ दूर करण्याच्या दृष्टीने करायलाच हवी; पण त्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांचे त्यावर एकमत हवे. □




लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य २० रुपये

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ अपमानित संपादकाची कथा....

इलस्ट्रेटेड विकली... या तुफान खप असलेल्या इंग्रजी साप्ताहिकाचे माजी संपादक खुशवंतसिग यांच्या कंपनीबरोबर असलेल्या करारनाम्याची मुदत संपत आली होती आणि मालकमंडळींबरोबर तणाव निर्माण झाल्याने हा करार संपताच त्यांची हकालपट्टी होणार हे स्पष्ट झाले होते. स्वतः सरदारजीही या गोष्टीला तयार होते. कंपनीबरोबर त्यांच्या निर्गमनाबाबत जो समझोता झाला होता त्याप्रमाणे १ ऑगस्टपासून ते कचेरीत येणार नव्हते. तथापि ३ सप्टेंबरच्या अंकापर्यंत संपादक म्हणून त्यांचे नाव ठेवण्यात येणार होते. खुशवंतसिग यांनी अनेक इंग्रजी पाक्षिकांना, साप्ताहिकांना दिलेल्या मुलाखतींबाबत मालकमंडळी नाराज होती. त्यांनी ही नाराजी व्यक्त केली, तरीही खुशवंतसिग यांनी मुलाखतींचा व मालकमंडळींवर टीका करण्याचा धडाका चालूच ठेवला. अखेरीस त्यांच्या विविध मुलाखतींच्या कात्रणांची एक फाइल तयार करण्यात आली आणि त्यांनी केलेल्या काही विधानांबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले. याबाबत वारंवार स्मरण देऊनही खुशवंतसिग यांनी काहीही स्पष्टीकरण दिले नाही. त्यांच्याविरुद्ध कारवाई होत असल्याची कुणकुण लागल्यावर त्यांच्या काही मित्रांनी त्यांना कल्पना दिली; परंतु कडवटपणा निर्माण झाल्याखेरीज हे प्रकरण मिटणार नव्हते. अखेरीस तणाव निर्माण करणारा तो प्रसंग २५ जुलै रोजी साजरा झाला. खुशवंतसिग नेहमीप्रमाणे आपल्या कचेरीत आले आणि त्यांच्या हाती एक पत्र देण्यात आले. बेनेट कोलोमन कंपनीचे जनरल मॅनेजर तर्नेजा यांच्या सहीने देण्यात आलेल्या त्या पत्रामध्ये खुशवंतसिग यांना त्यांच्या संपादकीय जबाबदारीतून ताबडतोब मोकळे करण्यात येत असल्याचे नमूद करणारा मजकूर होता. सरदारजी शांतपणे उठले, आपली छत्री घेतली आणि देशामधील सर्वात जास्त खप असलेल्या विकलीच्या संपादकाची खुर्ची त्यांनी कायमची सोडली; नव्हे त्यांना ती सोडावी लागली! एका कर्तृत्ववान संपादकाच्या यशस्वी कारकीर्दीची अपमानित अखेर झाली!

विकली आणि खुशवंतसिग यांचे सूत जमत नसल्याच्या वार्ता तशा कित्येक दिवस येत होत्या. बदललेल्या परिस्थितीतही त्यांनी इंदिरा गांधी व संजय गांधी यांना झुकते माप दिले. त्यांना अनुकूलता दर्शविणारी आपली मते परखडपणे प्रसिद्ध केली. या व्यवसायात मालकमंडळी सहसा प्रस्थापितांच्या विरुद्ध जात नाहीत आणि ज्या टाइम्स गटातर्फे हे साप्ताहिक प्रसिद्ध होते तो गट तर उगवतीला नमस्कार घालणाऱ्या मालकमंडळींचा. स्वाभाविकपणे प्रचंड खप असलेल्या या वीकलीच्या संपादकांनी हे असले भलतेच स्वातंत्र्य घेणे मालकमंडळींना मानवण्यासारखे नव्हते आणि सरदारजीही हा प्रश्न प्रतिष्ठेचा करून बसले होते. स्वाभाविकपणे सरदारजींना जावे लागणार ही दिसती गोष्ट होती. ते ठरल्याप्रमाणे ऑगस्टमध्ये जाते तर कदाचित पुन्हा या विषयाची चर्चाही झाली नसती; परंतु त्यांना निवृत्त करून, नव्हे त्यांना हाकलून देऊन त्यांच्या जागी एम. व्ही. कामथ यांना आणून बसविल्याने हे प्रकरण मालकांना सोईस्कर ठरेल अशा पद्धतीने मिटायला आले असताना इतक्या घाई-गर्दीने आणि अपमानितपद्धतीने या यशस्वी संपादकाची उचलबांगडी का करण्यात आली? असे सांगण्यात येते की, खुशवंतसिग यांचे दोन लेख लिहून तयार होते आणि त्यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या अखेरच्या अंकात ते प्रसिद्ध होणार होते. पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्यावर एक ' टिपिकल इंडियन ' या नावाचा एक लेख लिहून त्यांनी हातावेगळा केला होता. खेरीज आपल्या वाचकांचा निरोप घेणारे एक संपादकीयही त्यांनी लिहून तयार ठेवले होते खुशवंतसिग यांच्या मोरारजीभाईंवरील लेखाबाबत मालकमंडळी धास्तावलेली होती. आपल्या अखेरच्या संपादकीयामध्ये त्यांनी काही गोष्टी निर्भीडपणे मांडल्या होत्या आणि मालकमंडळींबाबत काही शेरेबाजीही केली होती. जैन कंपनीला ही नमकहरामी सहन करणे शक्य झाले नाही. तेव्हा त्यांना कामावर ठेवून वादविवाद करीत बसण्यापेक्षा त्यांना कामावरून दूर करणे या मंडळींनी अधिक पसंत केले आणि संपादकापेक्षा आपण हुशार आहोत हेही सिद्ध केले. या जागी टाइम्सचे न्यूयॉर्कमधील प्रतिनिधी एम्. व्ही. कामथ यांची नियुक्ती करण्यात आली. कामथ ही जागा घेण्यास फारसे उत्सुक नव्हते, तसेच फारसे नाराजही नव्हते. त्यांना साप्ताहिकापेक्षा दैनिकामध्ये जास्त रस होता; पण त्यांचे मन वळविण्यात आले आणि खुशवंतसिग यांची हकालपट्टी होताच कार्यवाही संपादक म्हणून कामथ यांची नेमणूक करण्यात आली. या घडामोडी चालू असताना कामथ दोन आठवडे काहीशा गोंधळलेल्या मनस्थितीमध्ये वावरत होते. असेही बोलले जाते की, टिपिकल इंडियन याच नावाचा एक लेख कामथ यांना लिहिण्यास सांगण्यात आले आणि मुखपृष्ठावर खुशवंतसिग यांचे जे नाव होते ते काढून त्याजागी कामथ यांचे नाव टाकण्यात आले.

खुशवंतसिग यांना लगोलग जावे लागले तरी या प्रकरणी कडवटपणा टळावा म्हणून तर्नेजा यांनी खुशवंतसिग यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण खुशवंतसिग इतके नाराज झाले

पृष्ठ १९ वर

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरंदरे

# चेकोस्लोव्हाकिया : स्वातंत्र्याचे दहावे श्राद्ध

२१ ऑगस्ट १९६८ ला प्रागच्या रस्त्यावरून सोविएत रणगाडे फिरले आणि त्यांनी चेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याच्या शवपेटीला अखेरचे खिळे मारले.परवाच्या २१ ऑगस्टला या दुर्घटनेला दहा वर्षे पूर्ण झाली. प्रत्यक्ष चेकोस्लोव्हाकियामध्ये आणि त्याची राजधानी प्रागमध्ये शांतताच होती. हरविलेल्या स्वातंत्र्यामुळे झालेल्या जनतेचा प्रथम प्रथम या स्मृतिदिनी प्रागमध्ये निषेधदर्शक गोंधळ होत असे; पण या वेळी तेही झाले नाही. रशियाने नागड्या सत्तालालसेने लादलेली राजवट अजूनही भक्कम पकड ठेवून असल्याने ही वस्तुस्थिती स्वीकारल्यासारखी भूमिका चेक जनतेने घेतलेली दिसते. पश्चिम युरोपमध्ये मात्र या दिनाची आठवण लोकशाहीवादी राष्ट्रांनी काढून नक्राश्रू ढाळले.

दहा वर्षांपूर्वी हे सक्तीचे सत्तान्तर जेव्हा प्रागमध्ये घडले, तेव्हा अलेक्झांडर डचुबेक हा चेकोस्लोव्हाकियाच्या कम्युनिस्ट पक्षाचा अध्यक्ष होता. चेकोस्लोव्हाकियामध्ये क्वचितच एखाद्याला मिळाली असेल इतकी लोकप्रियता त्याला लाभलेली होती. वॉर्सा कराराला ( १४ मे १९५५ ) तेरा वर्षे लोटलेली होती आणि त्याचा अर्थ लावण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक सभासद–राष्ट्राला आहे, असा डचुबेकचा दावा होता. याचीच फळे त्याला भोगावी लागली.

अल्बानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड, रुमानिया ही वॉर्सा–करारातील इतर राष्ट्रे होत. सोविएत रशिया हा जागतिक प्रोलेटॅरिएटचा नेता असल्याचा त्यांचा अढळ विश्वास होता आणि युरोपात पाय रोवायला रशियालाही यांची जरुरी होती, म्हणून वॉर्सा–करारान्वये एकमेकांना लष्करी शिक्षण देण्याची ग्वाही देण्यात आली. या सर्व राष्ट्रांतील चेकोस्लोव्हाकियालाच सगळ्यात खडतर इतिहासातून जावे लागलेले होते. ऑस्ट्रिया सोडता युरोपातील इतर कोणत्याही देशापेक्षा चेकोस्लोव्हाकियावर नाझींचे अधिक काळ वर्चस्व होते. १९४५ ते १९४८ हा काळ अस्थिरतेचा गेला आणि १९४८ नंतर १९६८ मध्ये डचुबेकने परत एकदा भाषण-स्वातंत्र्य बहाल करीपर्यंत चेक जनता तोंड दाबूनच राज्यकर्ते सहन करीत होती; पण लोकांना ढिले सोडणे रशियाला कधीच आवडणारे नसते. त्यामुळे डचुबेकचे Socialism with Human face हे ध्येय रशियाला अजिबातच पटणारे नव्हते. डचुबेकच्या या नव्या धोरणानुसार रेडिओ, टी. व्ही. प्रेस सगळीकडे या नव्या बदलाची मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली. कम्युनिस्ट नसलेल्या राजकारण्यांचा सरकारवर दबाव असावा म्हणून दबावगट संघटित करण्याच्या कल्पनेला चालना मिळाली हा तर एकपक्षीय हुकूमशाहीवर हल्ला होता. हा धमालीचा काळ Prague Spring या नावाने ओळखला जातो; पण हा वसंत पुरेसा फुलण्याआधीच विरडण्यात आला.

चेकोस्लोव्हाकियाला धोक्याची सूचना म्हणून १९६८ च्या २३ मार्चला रुमानिया वगळता बाकी वॉर्सा–कराराच्या सभासदांनी रशियाच्या बाजूने उभे रहाण्याच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला; पण तरीही डचुबेकने आपले अधिक स्वातंत्र्याचे धोरण रेटलेच. त्यामुळे मार्च ते ऑगस्टच्या दरम्यान रशियाचे व चेकोस्लोव्हाकियाचे संबंध झपाट्याने बिघडले. आक्रमणाच्या नऊ तासच आधी चेक पॉलिट ब्युरोची आगामी काँग्रेसमध्ये नव्या कम्युनिझमचे स्वरूप ठरविण्यासाठी बैठक सुरू झाली. रात्री पावणे अकरा वाजता सुरू झालेल्या या बैठकीला ९ लिबरल्स आणि ४ कॉन्झर्वेटिव्ज् हजर होते. लिबरल्सचा डचुबेकला पाठिंबा होता. बैठक सुरू होते न होते तोच, पंतप्रधान ओल्ड्रिश सेनिकला त्याच्या सेक्रेटरीने बोलवून घेतले. सेनिक परतला तो हतबुद्ध होऊनच ! सरसेनापती मार्टिन झुरला त्याच्या सोविएत सल्लागारांनी अटक केली होती. पाच सोशॅलिस्ट देशांनी ( वॉर्सा–करारातील इतर सभासद देश ) चेकोस्लोव्हाकियावर सैन्य घातल्याची बातमी झुरला त्यांच्याकडूनच कळली. सेनिकने ही बातमी पॉलिट-ब्यूरोत सांगताच वातावरण एकदम तापले. पहिली प्रतिक्रिया म्हणजे सामुदायिक धक्का आणि गोंधळाची होती. त्यात सुद्धा कॉन्झर्वेटिव्ज्नी रशियन आक्रमणाला पाठिंबा दर्शविला. संपूर्ण चेकोस्लोवाकिया पहाटे सहा वाजेपर्यंत रशियन आधिपत्याखाली येईल, हेही तोवर कळून चुकले. पहाटे चार वाजता ही बैठक जिथे चालू होती त्या पार्लमेंट बिल्डिंगला रशियन टँक्सचा व सैन्याचा वेढा पडला आणि रशियाने चेकोस्लोवाकिया अलगद गिळल्याचे स्पष्ट झाले. आजूबाजूला सुरुवातीला चेक स्वातंत्र्याचा जयजयकार करणारे लोकही पांगविले गेले आणि निर्मनुष्य रस्त्यातून सोशॅलिझमची वाटचाल चालू झाली.

यानंतर अल्पावधीत डचुबेकला मॉस्कोला नेण्यात आले. तिथे ब्रेझनेवने त्याला स्पष्ट शब्दांत रशियाच्या धोरणाची व चेकोस्लोवाकियाचे स्वातंत्र्य परत न देण्यासाठी हिसकावून घेतल्याची कल्पना दिली. अपमानित आणि फसविला गेलेला डचुबेक प्रागला परतला. १९६८ भर तो नाममात्र सेक्रेटरी राहिला. १ जानेवारी १९६९ला मात्र नवीन रिपब्लिक स्थापल्याची घोषणा झाली.

## डचुबेक आणि हुजाक

नव्या रिपब्लिकमध्ये अर्थातच जुन्या उदार मतवाद्यांना स्थान नव्हते. यात बळी पडलेल्यांमध्ये, डचुबेकखेरीज लुडविक स्वोबोदा हा तेव्हाचा अध्यक्ष, ओल्ड्रिश सेनिक हा पंतप्रधान, जोसेफ स्मोर्कोवस्की हा नॅशनल असेंब्लीचा चेअरमन आणि मार्टिन झुर हा जनरल हे होते. डचुबेक सध्या ब्राटिस्लोवा या त्याच्या मूळ छोट्या गावात जंगल-

खात्यात साधा अधिकारी म्हणून आयुष्य कंठीत आहे. त्याचे स्वतःचे शिक्षण रशियन शाळेमध्येच झालेले आहे कित्येक रशियन उच्चपदस्थ त्याचे मित्र असल्याने या रशियन कृत्याकडे ह्याने पाठीत खुपसलेला खंजीर, या दृष्टीने पाहिल्यास नवल नाही. सध्या डचुबेक राजकीयदृष्ट्या निष्क्रिय असला तरी त्याला आपल्या बाजूने वळविण्याचा आणि त्याची लोकप्रियता वापरण्याचा बराच प्रयत्न आजच्या रशियाधार्जिण्या सरकारने केला. त्यासाठी त्याच्यावर कल्पनातीत दडपण आणण्यात आले; पण तो त्याला बधला नाही. मध्यंतरी सगळ्या कोंडीचा स्फोट करायचा म्हणून डचुबेकने पार्लमेंटला एक भले मोठे पत्र लिहिले. ते अर्थातच चेक प्रेसमध्ये प्रसिद्धीला आले नाही, ते कसे तरी चेकोस्लोव्हाकियाच्या बाहेर पोचल्यावर पाश्चिमात्य वृत्तपत्रांनी ते छापले. त्याचा परिणाम असा झाला की, 'प्रागच्या वसंतऋतू' मध्ये जे जे आघाडीवर होते अशा डचुबेकबद्दल सहानुभूती बाळगून असणाऱ्या १३५ माजी पक्षनेत्यांच्या, लेखक, विद्यार्थ्यांच्या रातोरात झडत्या घेण्यात आल्या. डॉ.विल्यम प्रेशम या इतिहासतज्ञाच्या आयुष्यभराच्या नोट्स त्या रात्रीत गायब झाल्या.

डचुबेकला पदच्युत केल्यानंतर मॉस्कोने 'आपला' माणूस प्रागमध्ये बसविला. तो म्हणजे गुस्ताव हुजाक! स्टॅलिनच्या कारकीर्दीत १९५०–५५ च्या दरम्यान तो तुरुंगातच होता. प्रागच्या वसंतबहारात तो डचुबेकचा सतत उदोउदो करीत असे; पण आक्रमणानंतरच्या परिस्थितीचा तत्काळ आढावा घेऊन त्याने टोपी बदलली. त्याचे बक्षीस म्हणून त्याला अध्यक्षपद मिळाले. गेली दहा वर्षे तोच अध्यक्ष आहे. हंगेरीच्या जानोस कादारप्रमाणे त्याने मात्र हळू हळू राज्यकारभार सैल करण्याचे मनावर घेतलेले नाही. हंगेरीमध्ये रशियाने कादारला सत्तेवर बसविल्यानंतर पाच वर्षातच त्याने थोडे फार स्वातंत्र्य देण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्याला संघटित विरोध नाही. ती परिस्थिती चेकोस्लोव्हाकियात नाही. चार्टर' ७७ ही संघटना सरकारविरोधात उभी होत आहे.

## चार्टर' ७७

चेकोस्लोव्हाकियाच्या बुद्धिवंतांनी ही संघटना उभारलेली आहे आणि प्रामुख्याने मानवी हक्कांच्या प्रश्नावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. वैयक्तिक विरोधापेक्षा कायदा बदलण्यासाठी सामाजिक विरोध निर्माण करण्याची कल्पना याच्या मुळाशी आहे. याची सुरुवात प्रथम डचुबेकची विचारसरणी ज्यांना थोडी बहुत पटलेली आहे अशा त्याच्या साथीदारांनी केली. 'सोशॅलिस्ट मुव्हमेंट ऑफ चेक सिटिझन्स' या नावाखाली १९७१ मध्ये त्यांनी प्रथम विरोध नोंदविला. पोलिसांनी जवळजवळ दोनशे जणांना अटक केली, ४७ जणांना तुरुंगात धाडले; पण चळवळ फोफावतच राहिली. ट्रॉट्स्कीवादी सोशल डेमोक्रॅट्सही त्याला सामील झाले. इटालियन कम्युनिझमपासून त्यांनी विशेष स्फूर्ती घेतली. त्यातूनच पुढे चार्टर' ७७ ही संस्था जन्माला आली. प्रथम त्यावर २४० जणांनी सह्या केल्या होत्या. त्यांच्यावर दहशतीचे वरवंटे फिरले. ११ तासांच्या सततच्या चौकशीनंतर जॉन पॅटोक हा तत्त्वज्ञ हार्टअॅटॅकने मेला. तो या २४० जणांमधला एक होता. सह्या करणाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या, घरांवर धाडी पडल्या; मुलांना शिक्षण नाकारण्यात आले, मोटारींना अपघात घडविण्यात आले आणि तरीही संघटनेची सख्या आता ९०० वर गेली आहे. त्यांना सामान्य माणसाचा सक्रिय पाठिंबा मिळणे कठीण आहे; पण आंतरराष्ट्रीय दडपणाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. गेल्या दीड वर्षात त्यांनी १८ पत्रके प्रसिद्ध केली. केवळ युरोकम्युनिस्टांनाच नव्हे तर बाहेरच्या लोकशाहीवादी राष्ट्रांनाही आवाहन करण्यात आले आहे. ब्रेझनेवने या मेमध्ये प्रागला भेट दिली. तेव्हा दोनशे चार्टिस्टांना अटक करून शांततेची खबरदारी बाळगण्यात आली. आताच्या २० ऑगस्टला सुद्धा बहुतेक चार्टिस्टांना (जे अजून तुरुंगात नाहीत) प्रागच्या बाहेर जाऊन रविवार घालविण्याची विनंती करण्यात आली, त्यामळे प्रागचा रविवार शांततेत पार पडला. इतिहासतज्ज्ञ क्रीगेल हा या चळवळीचा सध्याचा प्रणेता आहे. सामान्य माणस यांना पाठिंबा का दर्शवू शकत नाही आणि सरकारशी मिळवून घेण्याचा प्रयत्न का करतो, हे सरकारच्या दडपशाहीच्या भयानक स्वरूपावरून स्पष्ट होईल.

## सरकारी दडपशाही

२० ऑगस्ट १९६८ ला चेकोस्लोव्हाकियाचे स्वातंत्र्य संपुष्टात आल्यावर थोड्याच अवधीत डचुबेकवाद्यांना हाकलण्याची मोहीम सुरू झाली. कम्युनिस्ट राजवटीत जे आजवर अटळ ठरलेले आहे तेच इथेही घडू लागले. पन्नास लाख लोकांना आतापर्यंत चौकशीला तोंड द्यावे लागले आहे. गेली दहा वर्षे प्रत्येक संस्था, प्रत्येक कामगार-संघटना, प्रत्येक साधीसुधी सघटना, प्रत्येक फर्म, फॅक्टरी. शाळा, कॉलेज, युनिव्हर्सिटी यातून हे चौकशीसत्र चालू होते. प्रश्न प्रामुख्याने सत्तांतराच्या काळातील त्या व्यक्तीची भूमिका, याभोवती केंद्रित असत. बहुतेक वेळा हे सत्र एक तासापेक्षाही अधिक काळ चालते. त्यात जरा जरी संशयास्पद काही आढळले, तरी योग्य ती शिक्षा दिली जाते. आजवर पाच लाखांहून अधिक लोकांना पक्षातून काढून टाकले. पक्षातून काढून टाकले, याचा अर्थ कम्युनिस्टांच्या शब्दकोषात जगण्याचा हक्क काढून घेणे असाच होतो. कारण जे पक्षातून काढले जातात, त्यांच्या नोकऱ्या जातात, ते वाळीत टाकले जातात. या पाच लाखांत १० टक्के सरकारी नोकर, २० टक्के ट्रेड युनियन कामगार, ४० टक्के मॅनेजर्स होते. ५२० शैक्षणिक संस्था घुसळल्या गेल्या. त्यातल्या ४० बंद पाडण्यात आल्या. हजारो शिक्षक नोकऱ्यांना मुकले. १९६८ च्या आधीच्यातील निम्म्या पत्रकारांना हाकलले गेले. प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रम सेन्सॉर केला जातो. चित्रपटव्यवसायाला मंदी आली, चेक गोष्टींचे महत्त्वच एकूण कमी झाले. सरकारचा आवडता उद्योग म्हणजे चुकणाऱ्यांना खालच्या प्रतीची नोकरी देणे यात बळी पडलेले काही लोक पाहण्यासारखे आहेत– जिरी फ्रोड हा पत्रकार आज मोटारी धुतो; एफेनबेर्गर हा शास्त्रज्ञ वॉचमन आहे; इवान देजमाल हा इंजिनिअर एका मुतारीचा पहारेकरी आहे. अँटनी बोकोवा हा इतिहासतज्ज्ञ पोस्टात क्लार्क आहे. कुश्नी हा तत्त्वज्ञ बहुतेक वेळ बेकार आणि मधूनमधून कष्टाची कामे करतो. असेच अनेक बुद्धिवंत आज गवंडी, भंगी, चांभार म्हणून कामे करीत आहेत. वर्गहीन समाजरचनेच्या खटपटीत या वाळीत टाकलेल्या नव्या लोकांचा प्रचंड वर्ग निर्माण झालेला आहे. त्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश नाही, नातेवाइकांना प्रमोशन नाही. तात्पर्य, चेकोस्लोव्हाकियातील हा नवीन अस्पृश्यवर्ग आहे.

अर्थात् यामुळे सामाजिक तणाव निर्माण होऊन वरवरची शांतता फाडली जाईल, अशी आशा करायला हरकत नाही सरकारी माध्यमे आजही रशियाचे आक्रमण हे प्रतिक्रांतिवाद्यांना दिलेले योग्य व समयोचित उत्तर असल्याचा दावा करीत आहेत.

आणखी एक धक्कादायक बातमी परवाच या संदर्भात बाहेर आली. देनेक लिनर या डचुबेकच्या सहकाऱ्याने ब्रेझनेवने आक्रमणानंतर 'प्रागस्प्रिंग'च्या नेत्यांची जी भेट घेतली तिचा तपशील दिला आहे. त्यानुसार या आक्रमणाच्या दोनच दिवस आधी अमेरिकेचा तत्कालीन अध्यक्ष जॉन्सन याने ब्रेझनेवला स्पष्ट आश्वासन दिले होते की, अमेरिका चेकोस्लोव्हाकियाचे रक्षण करण्यासाठी काहीही करणार नाही, रशियाने आपली योजना खुशाल राबवावी! त्या वेळी आक्रोश करणाऱ्या अमेरिकेचे हे दुटप्पी खेळ नवीन नव्हेत. तात्पर्य, बड्या शक्तींच्या संमतीनेच ही गुलामगिरी लादण्यात आली आहे. ही कोंडी केव्हा फुटेल ते पहायचे! ☐

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## तिकिटाच्या खिडकीशी

मध्यंतरी मी मुंबईला गेले होते, कधी नव्हे ते! तसे मुंबईबद्दल लिहिण्यासारखे खूप आहे– अर्थात् आमच्या कलकत्त्याच्या तुलनेत. विशेष म्हणजे तिथली शिस्त पाहून तर अवाक् व्हायची पाळी आली. कलकत्त्याच्या बेशिस्त वातावरणात वाढलेल्या आम्हा मंडळींना त्या शिस्तबद्ध वातावरणात थोडेसे गुदमरल्यासारखेच वाटत होते. माझ्या लक्षात राहिले ते व्ही. टी. चे प्रचंड स्टेशन आणि कलकत्त्याचे रिझर्वेशन करायला गेले तेव्हाचा प्रसंग. भला-मोठा मांडव टाकलेला. (लोकांची केवढी तरी सोय बघतात हो! नाही तर इथे. चक्क उन्हात तासन् तास उभे राहावे लागते आणि खिडकीमागच्या माणसाच्या मिनतवाऱ्या तर कित्ती कराव्या लागतात!) रिझर्वेशनच्या खिडक्यांची एक लांबलचक ओळ. प्रत्येक खिडकीसमोर लोकांच्या लांब रांगा! शाळेच्या विद्यार्थ्यांनी पी. टी. ला उभे राहावे तशा. दृश्य तसे विलोभनीयच. ह्याच भाऊगर्दीत आपल्यालाही विरघळून जायचेय् ही कल्पना मनात तरंगू लागली. नेमके कोणत्या रांगेत उभे रहायचे ह्याचा विचार करीत होते; पण मांडवाजवळ जाताच एका लहानशा टबलाशी बसलेल्या माणसाने चट्कन् फॉर्म हातो दिला. आपली हावराची लाइन कोणती हे कुणाला तरी विचारावे म्हणून इकडे तिकडे बघत होते. (कारण विचारल्याशिवाय तुम्ही योग्य रांगेत उभे राहू शकणार नाही अशी आम्हाला सवय जडलेली.) तोच प्रत्येक खिडकीला लटकवलेला बोर्ड नजरेला पडला. कोणकोणत्या गाड्यांचा तिकिटे कोणकोणत्या खिडकीवर मिळताल हे व्यवस्थित इंग्रजी–हिंदी–मराठीत लिहिलेल्या पाट्या पाहून विस्मय वाटला. कुणालाही न विचारता मी अचूक हावऱ्याच्या रांगेत उभी राहिले आणि उभ्याउभ्याच फॉर्म भरला. प्रत्येक खिडकीशी अगदी शांतपणे तिकिट देणे– तिकिट घेणे हे व्यवहार सुरू होते. मनात विचार आला– इथली माणसे कोण्या सर्कसमध्ये शिकून आलीत कोण जाणे! माझी पाळी आली अन् मला तिकिट मिळाले. अर्धा तास (सावलीत) उभे राहण्यापलीकडे इतर कसलाही त्रास झाला नाही. इतक्या सहजपणे बुकिंग होऊ शकते याचे नवल करीतच मी परत फिरले. मला कलकत्त्याच्या बुकिंग ऑफिसची प्रकर्षाने आठवण आली. मुंबई आणि कलकत्ता – सगळ्याच बाबतीत दोन टोके आहेत ही! मला आठवले एस्प्लेनेडचे बुकिंग ऑफिस. माणसे उन्हात भाजून निघतात, पण एखाद्या कापडी मांडवाची छाया त्यांना मिळत नाही. तिकिट देणारा बाबूमोशाय आपल्या लहरीप्रमाणे चहा–सिगरेटचा आस्वाद घेत घेत– अरेरावीने बोलत– तिकिटांचे वाटप करणार. जसा काही उपकारच करतोय् लोकांवर! हिशोबात पाच-दहा पैसे सुटे मिळणार असतील तर ते मिळतीलच ह्याची शाश्वती नाही ते खिडकीमागच्या माणसाच्याच हक्काचे आहेत, असे तुम्ही समजायचे. सिआलदा स्टेशन तर याहून विचित्र. बुकिंग ऑफिसच्या अशाच अनेक खिडक्या. तुम्हाला स्वतःची खिडकी ओळखू तर येणारच नाही; पण विचारले तर कुणी लवकर सांगणारही नाही! असे म्हणतात की, प्रत्येक खिडकीवर पाट्या होत्या एके काळी; पण त्यावरची अक्षरे जीर्णावस्थेमुळे अगदीच दिसेनाशी झाली होती; म्हणून कोणी तरी त्या पाट्या काढून टाकल्या म्हणे! अशा वेळी तुम्ही दुसरे काय करणार? राहा उभे एका रांगेत! तुमची पाळी आल्यावर खिडकीमागचा माणूस म्हणतो– 'एरवाने हॉबे ना.' मग पुन्हा दुसऱ्या रांगेत जाऊन उभे राहा. या रांगेत तुम्ही शेवटचे असता. आपली पाळी येईपर्यंत उभे राहून वाट बघा. पुन्हा तोच अनुभव आला की, चला पुन्हा तिसऱ्या खिडकीशी! असे करीत गाडीची वेळ देखील होईल; पण घाबरायचे कारण नाही. ही गाडी लेट जाणार आहे, असे मनाशी म्हणत रांगेतच उभे राहायचे. कोणी सांगावे? कदाचित् गाडी खरोखरच लेट जायची. कशाचा काही नेमच नाही. कारण शिस्तीत आम्ही कधी वाढलोच नाही!

## सहानुभूतीचा बुरूज ढासळला!

अलीकडे रोज दुपारी तीन–चार वेळा तरी दार खडखडतं. कोण आले असावे याचा विचार करीतच प्रथम मी दार उघडायला जायची; पण आताशा माझे अंदाज अगदी अचूक असतात. दार उघडावे तो अपेक्षेप्रमाणे एखादी सेल्सगर्ल समोर उभी असते. दुसऱ्याच क्षणी ती झोळीतून एखादी वस्तू बाहेर काढते—साबण पावडर, एखादा शांपू, टूथ पेस्ट, उदबत्तीचे पुडे—अशासारखंच काही तरी असतं. मग त्या वस्तूच्या स्तुतीप्रीत्यर्थ पाठ केलेल्या भाषणाची उजळणी ती मला ऐकवते आणि मग 'घ्याच!' म्हणून आग्रह करते. 'मला नको, सध्या गरज नाही,' असे म्हणावे की पुढे तिचे स्वतःच्या हलाखीच्या आर्थिक परिस्थितीचे वर्णन सुरू होतं. त्यामुळे कधी कधी दयेखातर एखादी वस्तु नाइलाज म्हणून घ्यावी लागते. तिच्या परिस्थितीचे चित्र मला अस्वस्थ करून सोडते. ती ग्रॅज्युएट झालेली असते नुकतीच. बापाचा पैसा शिक्षणावर खर्च झालेला असतो. हुंड्याची तरतूद होईपर्यंत बंगाली मुलीचे लग्न होऊच शकत नाही! म्हणूनच की काय, येथील मुली बऱ्याच मोठ्या होईपर्यंत त्यांची लग्ने जमत नाहीत. मग काही तरी उद्योग हवा म्हणून व नोकरी मिळणे अत्यंत दुरापास्त म्हणून ही सेल्सगर्लची कामे त्या पत्करतात.

अशा कित्येक सुशिक्षित मुली दारोदार हिंडून निरनिराळ्या कंपन्यांचा माल विकून देतात व जे काय कमिशन मिळेल ते वसूल करतात.

ह्या मुलींच्या जीवनाबद्दल उगाचच कुतूहल वाटल्यामुळे अनेक मुलींशी आत्मीयतेच्या भावनेने बोलायला मी सुरुवात केली. ह्या निमित्ताने कुणी 'दहा मिनिटं बसू का?' म्हणून विचारीत, त्यांना मी बसवून घेई. थोडा श्रमपरिहार झाला की, उठून धन्यवाद देऊन त्या चालू लागत. त्या निघून गल्यावरही त्यांचाच विचार माझ्या मनात रेंगाळत राही. कारण त्यांच्याशी थोड्याशा वेळात जे काय बोलणे होई त्यावरून त्या सहन करीत असलेल्या कष्टांमुळे मला त्यांच्याविषयी अपार सहानुभूती वाटे.

ह्यांच्यामध्ये चटपट राहणं, तुटकं–फुटकं हिंदी–इंग्रजी बोलणं, अशांचाच भरणा अधिक असतो. तुझ्या घरी कोण कोण आहेत? तू

मॅरिड आहेस, तेव्हा नवरा काय करतो? मूल केवढे आहे? त्याला कुठे ठेवतेस? रोज किती घरी हिंडतेस? किती विक्री होते? कमिशन कोणत्या प्रमाणात मिळते? घरोघरी काय अनुभव येतात? इत्यादी अनेक प्रश्न मी ह्या पोरींना विचारू लागले. वाटले, ह्या विषयाला धरून आपल्याला काही लिहिता येईल. माझी उत्सुकता वाढत होती. मनात ह्या सेल्सगर्लसूच्या अस्थिर व काहीशा असुरक्षित जीवनाविषयी उलटसुलट विचारांची मालिका तयार होत होती. तेवढ्यात—

एक दिवस अशीच एक 'मॉडर्न' सेल्स- गर्ल दाराशी आली. मुलगी स्मार्ट होती. बोलणं मृदु होतं. तिच्या भांगात सिंदूर नव्हता म्हणून मला वाटलं नुकतीच बी. ए. झालेली अविवाहित मुलगी असावी; पण ती म्हणाली, नवऱ्याला नोकरी नाही. तोही असाच दारोदार कंपनीचा माल विकतो. लहान बाळाला दिवसभर आईकडे ठेवते, म्हणाली. कमिशन-व्यतिरिक्त तिला पगारही मिळतो, असं तिने सांगितलं; पण ही नोकरी (?) परमनंट नाही. जरूर पडली की बोलावणं येतं. मधून मधून घरीच बसावं लागतं. अशा चाळीस मुली काम करतात माझ्याबरोबर; पण मी त्या सर्वांची हेड आहे, असं तिनं अभिमानाने सांगितलं. नंतर भानावर यऊन आपली ठरलेली रेकॉर्ड वाजविली. ती उदबत्ती विकायला आली होती. तिच्याकडून दोन पुडे घेतले. मला घ्यावेच लागले व तिने मागितलेले तीन रु. किमतीदाखल तिच्या हातावर ठेवताच ती पसार झाली.

दुसऱ्या दिवशी मला शेजारच्या बाईने म्हटलं, 'काल तुला त्या उदबत्तीवालीने कसं लुबाडलं बघ. मला दोन रुपयात दोन पुडे दिले अन् तुझ्याकडून तीन रुपये वसूल केले. किती बदमाष असतात ह्या पोरी पाहिलंस!' मी हे एकून थक्कच झाले. वास्तविक मी तिला सहानुभूती दाखविली होती. आस्था- पूर्वक तिची चौकशी केली होती. तिला पाणी पाजलं होतं आणि त्या मोबदल्यात तिने मला चक्क फसवलं होतं. मधल्यामधे ह्या मुली असे किती तरी पैसे मारीत असतील ह्या कल्पनेने मला त्यांच्याविषयी एकदम तिरस्कार वाटू लागला. सारी आस्था जमीनदोस्त झाली! इतःपर कोणत्याही सेल्स गर्लला दाराशी उभं करायचं नाही, असा मी निश्चय केला. ❑

# मद्रास मेल

प्रा. श्री. स. ओगले

तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री एम. करुणानिधी म्हणजे एक विवाद्य व्यक्ति- मत्त्वच आहे. आजपर्यन्त तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांची जी परंपरा आहे त्याप्रमाणे करुणानिधी हे एक सिनेनट व राजकारणी म्हणून प्रसिद्ध आहेत. सिनेनट म्हणून वा राजकारणी म्हणून त्यांनी आपल्या जशा प्रतिमा तयार केल्या तशाच त्या भ्रष्टही केल्यात. इंदिरा गांधींच्या राज्यात इंदिरा गांधींनाच विरोध केला म्हणून त्यांना सत्ते- वरून तर उतरावे लागलेच; परंतु चौक- शीचा सरकारिया आयोगही गळ्यात अड- कवून घ्यावा लागला. नाही तर कदाचित त्यांचे कथित भ्रष्टाचार इंदिराजींच्या आशीर्वादाखाली लपलेही असते. सरकारिया आयोग करुणानिधींच्या अनेक भ्रष्टाचारां- विषयी चौकशी करीत आहे. त्यांपैकी २९ लाख रुपयांच्या करुणानिधींवर केलेल्या कथित आरोपाविषयीही चौकशी करीत आहे. ते मुख्यमंत्री असताना एका कामाचा ठेका मंजूर करताना त्यांनी ही रक्कम घेतली अशा त्यांच्यावर आरोप आहे.

मद्रास शहरातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर व्हावी म्हणून दक्षिण अर्काट जिल्ह्यात २१ कोटी ४० लाख रुपये खर्च करून एक विशाल जलाशय निर्माण कर- ण्याची योजना करुणानिधी मुख्यमंत्रिपदावर असताना आखण्यात आली. ह्या योजनेला 'विरानम योजना' म्हणून नाव देण्यात आले. निरनिराळ्या ठेकेदारांकडून ह्यासाठी आवे- दने मागविण्यात आली. दि. २२ जानेवारी १९७० रोजी ही टेंडर्स उघडण्याच्या दिव- शीच तामिळनाडूमधील मे. सत्यनारायण ब्रदर्सचे भागीदार श्री. पुरुषोत्तम आपल्या मोटारने आले व इतरांबरोबरच आपलेही आवेदन (टेंडर) तामिळनाडूच्या मुख्य अभियंत्यास त्यांनी सादर केले. त्याच दिवशी संध्याकाळी टेंडर्स उघडण्यात आली व मे. सत्यनारायण ब्रदर्स लि. ह्या कंपनीचे टेंडर सर्वांत कमी दराचे म्हणून स्वीकारण्यात आले. त्यांनी हे काम १५ कोटी ६५ लक्ष ८७ हजार रुपयांत करण्याचे स्वीकारले होते. त्यांचे टेंडर मुख्य अभियंत्याने स्वीका- रूनही त्याची अंतिम स्वीकृती त्या वेळच्या तामिळनाडू सरकारच्या म्हणजेच मुख्यमंत्री करुणानिधी यांचे हाती असल्याचे श्री. पुरुषोत्तम यांना सांगण्यात आले. त्या वेळी सरकारने मुख्य अभियंत्यास अशी सूचना केली होती म्हणतात की, ५ लाख रुपयांच्या वरील ठेके मुख्यमंत्री करुणानिधी यांच्याच संमतीने द्यावेत. याशाठी असे कारण पुढे करण्यात आले की, तामिळनाडू लोककर्म- विभागात अतिशय भ्रष्टाचार माजलेला आहे व मुख्यमंत्री करुणानिधी हा भ्रष्टाचार निपटून काढू इच्छितात. ही त्यांची भ्रष्टा- चारनिर्मूलनाची मोहीम अर्थातच जनतेस खूष करण्यास व आपली लोकप्रियता वाढ- विण्यासाठीच होती.

वरील 'विरानम योजने'चे काम स्वीका- रताना सत्यनारायण ब्रदर्स कं. ने एका ग्रीक फर्मचा सहकार घेण्याचे ठरविले होते व हे टेंडर उघडताना श्री. पुरुषोत्तम यांच्या- बरोबरच त्याही कंपनीचे श्री. कोसेविडस् हेही हजर होते. मुख्य अभियंत्याच्या मंजुरी- नंतर मुख्यमंत्र्यांकडूनही हा ठेका मंजूर व्हावा म्हणून वरील दोन्ही कंपनींच्या मालकांनी मुख्यमंत्री करुणानिधी यांचेकडे वशिला लावण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी त्यांच्या व श्री. करुणानिधी यांच्या विश्वा- सातील एक मध्यस्थ श्री. मादान यांची योजना केली. श्री. करुणानिधी यांनीच श्री. मादान यांना 'पचैय्याप्पस ट्रस्ट बोर्ड'चे अध्यक्ष केले होते. श्री. मादान यांनी सत्य- नारायण कं. चे श्री. पुरुषोत्तम यांना सांगितले की, जर त्यांची कंपनी कमिशन देण्यास तयार असेल तर त्यांना ते काम मिळू शकेल व हे कमिशन मुख्यमंत्री श्री. करुणानिधी ह्यांनाच द्यावे लागेल. ते किती द्यावे लागेल? अशी विचारणा झाल्यावर ते २॥ टक्के द्यावे लागेल असे त्यांना सूचित करण्यात आले. म्हणजे एकूण चाळीस लाख रुपये त्यांना कमिशन द्यावे लागणार होते. हा एवढा मोठा कमिशनचा आकडा ऐकल्यावर मे. सत्यनारायण आणि कं.चा छाती दडपली व हा आकडा १०–१५ लाखांपर्यंत कमी

करण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला; परंतु त्यात त्यांना यश आले नाही. आता हे काम आपल्या हातून जाणार ह्या भीतीने व एकंदर काम खूप मोठे व प्रतिष्ठा वाढविणारे असल्यामुळे शेवटी त्यांनी ह्या गोष्टीस मंजुरी दिली; परंतु त्यांना ५ लाख रुपये आगाऊ रक्कम मागण्यात आली. सत्यनारायण कंपनीने खूप खळखळ केली; परंतु काही उपयोग झाला नाही. शेवटी मार्च १९७७ च्या एक रात्री सत्यनारायण कं. तर्फे श्री. पुरुषोत्तम ५ लाख रुपये घेऊन श्री. मादान यांचकडे गेले व त्यानंतर ते दोघेजण करुणानिधी यांचेकडे गेले. प्रथम मादान करुणानिधींना भेटून आले व त्यानंतर श्री. पुरुषोत्तम यांचेसह परत त्यांनी करुणानिधींची भेट घेतली. तिथे श्री. पुरुषोत्तम यांनी सुटकेसमधून आणलेले १०० च्या नोटांमधील ५ लाख रुपये करुणानिधींनी काढून घेतले व चहापानानंतर त्यांची ही भेट संपली; परंतु ह्यानंतरही लगेच मे. सत्यनारायण ब्रदर्स लि. ला लिखित आदेश मिळाला नाही. वारंवार चौकशी केल्यानंतर मे १९७७ मध्ये लोककर्मविभागाचे मुख्य अभियंत्याने त्यांना एक अस्थायी स्वरूपाचा आदेश दिला व मे. सत्यनारायण ब्रदर्स यांचे सोबत काम करणाऱ्या विदेशी कंपनीच्या कार्यक्षमतेची व त्यांच्या परदेशातील ह्या प्रकारच्या कामांची पाहणी केल्याशिवाय स्थायी स्वरूपाचा ठेका मिळणार नाही असे त्यांना सांगण्यात आले. शेवटी २६ मे १९७० रोजी लोककर्मविभागाचे मंत्री श्री. सादिक पाशा, विरानम योजनेचे मुख्य अभियंता श्री. हुसेन, सहाय्यक सचिव एम. विश्वनाथन आणि जलविभाग सहाय्यक सचिव नटराजन इ. चा एक अभ्यासगट परदेशदौरा करून आला. ह्या सर्वांच्या प्रवासाचा खर्च त्या कंपनीचे मालक श्री. कोस्टेविडीत यांनी केला. ह्या साऱ्यानंतर १५ जुलै १९७० रोजी मे. सत्यनारायण ब्रदर्स लि. ह्या कंपनीस 'विरानम योजनेचा' स्थायी स्वरूपाचा ठेका देण्यात आला व १० लाख रु. रक्कम अग्रिम म्हणून मंजूर करण्यात आली व परत जानेवारी १९७१ मध्ये ५० लाख रुपये देण्यात आले व काम लवकर सुरू करण्याची सूचना देण्यात आली.

परत मादान यांचे तर्फे करारातील बाकी रक्कम देण्याची सत्यनारायण कंपनीला सूचना देण्यात आली. पुन्हा कंपनीतर्फे पुरुषोत्तम ६ लाख रुपये घेऊन श्री. मादान यांचे सोबत करुणानिधींकडे गेले व तिथे त्यांनी पैशांनी भरलेली सुटकेस रिकामी केली. मार्च १९७१ मध्ये परत ४ लाख रुपये पोहोचविले. ऑगस्ट १९७१ मध्ये करुणानिधींच्या वारंवार निरोपानंतर ५ लाख रुपये देण्यात आले. ह्या वेळी मादान पुरुषोत्तमबरोबर नव्हते. अजूनही करुणानिधींना त्यांनी ठरविलेली रक्कम पूर्ण मिळालेली नव्हती. परत फेब्रुवारी १९७३ व ऑगस्ट १९७४ अशा दोन हप्त्यांत आणखी ९ लाख रुपये करुणानिधींना देण्यात आले होते. म्हणजे आतापावेतो एकूण २९ लाख रुपयांचा मलिदा करुणानिधींना देण्यात आला होता आणि त्याचा फायदाही सत्यनारायण कंपनीला झालेला होता. कारण तामिळनाडू सरकारकडून 'विरानम योजने'ची विशेष प्रगती होण्याआधीच ९० लाख रुपये कंपनीला देण्यात आले होते. पुढल्याच वर्षी करुणानिधींनी इंदिरा गांधींना विरोध केल्याने व त्यांचेवर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आल्यामुळे 'द्रविड मुन्नेत्र सरकार' बरखास्त करण्यात आले व त्याचबरोबर करुणानिधींची चौकशी करण्यासाठी 'सरकारिया आयोग' नेमण्यात आला. करुणानिधींच्या सत्ताभ्रष्टतेबरोबरच मे. सत्यनारायण कं. चे श्री. पुरुषोत्तम यांनी ही भ्रष्टाचाराची माहिती 'सरकारिया आयोगा' पुढे मांडली. ह्या रकमेची अर्थातच कंपनीच्या कोणत्याच खात्यात नोंद नव्हती. फक्त वेळोवेळी करुणानिधींना पैसे देताना बँकामधून जी काही पैशांची जमवाजमव कंपनीने केली होती तेवढीच अर्थातच करुणानिधींनी हे साफ नाकारले व त्यांना राजकीय जीवनातून उठविण्यासाठी करण्यात आलेला हा एक कट आहे असे सांगितले. हा एक राजकीय सूड आहे असे त्याचे म्हणणे आहे.

आयोगाची कारवाई अजून चालू आहे. □

('माया' एप्रिल १९७८ हिंदी मासिकावरून)


आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध
स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक

**जनांचा प्रवाहो चालिला**

लेखक : विनय हर्डीकर

किंमत : वीस रुपये

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा...........

**मॅक्झिम गॉर्की**

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

'शब्दप्रधान गायकी' या संगीतकार श्री. यशवंत देव यांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नुकताच मुंबईत पार पडला.

# रंगलेला प्रकाशन समारंभ

उषा मेहता

'शब्दप्रधान गायकी' या यशवंत देव यांच्या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाच्या आमंत्रणपत्रिकेवर मंगेश पाडगावकरांच्या प्रास्ताविकातीलच खालील परिच्छेद छापला होता.

'गीत ही एक अर्थी सहकारी कला आहे. कवी, संगीत दिग्दर्शक आणि गायक असे क्रमाने येणारे तीन घटक ही कलाकृती पूर्ण करतात. एकटा संगीत दिग्दर्शक किंवा एकटा गायक 'धून' निर्माण करू शकेल; पण गीत निर्माण करू शकणार नाही. या तिघांत अधिक महत्त्वाचा कोण, हा प्रश्न अर्थशून्य आहे. यातला प्रत्येक घटक आपापल्या परीने तितकाच महत्त्वाचा आहे. संगीत-दिग्दर्शक नसेल तर कवीची रचना केवळ शब्दरूप उरेल. गायक नसेल तर संगीतकाराने शब्दातून निर्माण केलेली स्वरांची बंदिश संवेदनाच्या कक्षेतच येणार नाही. या तिघांच्या प्रतिभा एकत्र येतील तेव्हाच गीताची प्राणधारणा होऊ शकेल. गीताची एकात्मता तीन स्वतंत्र प्रतिभेच्या कलावंतांच्या संवादातूनच निर्माण होऊ शकते. या तीन घटकांपैकी कुठलाही एक घटक फिका पडला किंवा एकाला अथवा दोघांना फाजील महत्त्व दिले गेले तर खऱ्या अर्थाने श्रेष्ठ दर्जाची कलाकृतीच निर्माण होऊ शकणार नाही.'

ती आमंत्रणपत्रिका वाचल्यानंतर प्रत्यक्ष प्रकाशन समारंभाच्या वेळी कवी किंवा संगीतदिग्दर्शक यांच्या श्रेष्ठत्वाविषयी प्रश्न उपस्थित करणारी एक फारच बहारदार अशी पण मिस्कीलशी भाषणांची मैफल रंगेल अशी जराही कल्पना आली नव्हती. नाही म्हटले तरी पुस्तक-प्रकाशन हा तसा औपचारिकच समारंभ. जरी तो 'कलासक्त' आणि 'पॉप्युलर'ने आयोजित केलेला असला तरी!

आरंभी उपस्थितांचे स्वागत करताना श्री. रामदास भटकळ म्हणाले, 'काव्य हा जरी आवडीचा विषय असला तरी कवितांची पुस्तकं, विशेषतः जुन्या कवींची पुस्तकं घेऊन आपण ती किती वाचतो याबद्दल मला शंका आहे; पण तसं असूनही तुकाराम-ज्ञानेश्वरांच्या काव्यापासून आजच्या समकालीन कवींच्या अनेक कविता या आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. हे मराठीतील काव्यधन संगीताच्या माध्यमातून कलावंतांनी आपल्यापर्यंत पोचविलेलं आहे. आपण ते सतत गुणगुणत असतो, ते आपल्या कानात-मनात घोळत असतं आणि मुळातून फारसं काही न वाचताही आपण बरंच काही वाचलं आहे, असा भासही आपल्याला होत असतो! ही किमया करणारे अनेक कलावंत आज इथे उपस्थित आहेत. 'शब्दप्रधान गायकी' या पुस्तकाचा जन्म हा श्री. देव यांच्या स्वतःच्या संगीत-दिग्दर्शक म्हणून केलेल्या कार्यातून झालेला आहे. कवीचे शब्द श्रोत्यांपर्यंत पोचविताना कोणकोणत्या गोष्टींचे भान राखावं लागतं, याबद्दलचे त्यांचे अनुभव आणि त्या अनुभवांतून त्यांनी केलेलं चिंतन यांचं प्रतिबिंब आपल्याला या पुस्तकात आढळेल.'

वसंत बापट या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते आणि हा समारंभ अत्यंत प्रसन्न वातावरणामध्ये जो अधिकाधिक खुलत गेला त्याचे मोठे श्रेय त्यांच्या कुशल सूत्रसंचालनाला आणि हजरजबाबीपणाला होते. पाहुण्यांना दिलेल्या पुष्पगुच्छांची टेबलावर खूप गर्दी झाली. बापट म्हणतात, 'कधी कधी फुलांचीच आरास इतकी होते की, देवदर्शन दुर्लभ होते' फुलांची भिंत हटविली गेली आणि उशीरा पुष्पगुच्छ ज्यांना दिला गेला त्या शांताबाईंना बापटांनी प्रथम आपले विचार व्यक्त करण्याची विनंती केली. शांताबाई म्हणाल्या, 'कुठल्याही प्रकारचं लेखन हे अजिबात सोपं नाही. अतिशय कंटाळा आणणारी, वेळ खाणारी, बऱ्याच वेळा माणसाला निरुत्साही वा नाउमेद करणारी ही गोष्ट देवांसारख्या संगीतक्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तीनं सुगम संगीत या विषयाचा इतका बारकाईनं सांगोपांग विचार करावा आणि एवढे श्रम घेऊन त्यांनी हा लेखनाचाही प्रपंच करावा, ही एकच गोष्ट त्यांना या विषयाबद्दल किती प्रेम आणि तळमळ आहे, हे सिद्ध करण्यास समर्थ आहे. एका संगीत दिग्दर्शकानं आपल्या अनुभवांच्या चिंतनातून अशा प्रकारचं लेखन करावं, ही घटना मला संगीतक्षेत्रातील फार महत्त्वाची घटना वाटते. त्याचप्रमाणे भटकळांनीही अशा श्राव्य विषयावरचे पुस्तक प्रकाशित करण्याचे जे साहस दाखविले आहे त्याबद्दल त्यांचेही मला अभिनंदन करावेसे वाटते.'

समारंभ सुरू होण्यापूर्वीच्या गप्पा-गोष्टीमध्ये बापटांनी एक प्रश्न उपस्थित केला होता. 'सुगम किंवा ललीत संगीतासारख्या गोष्टीचे शास्त्र होऊ शकते का?' त्यावर बोलताना शांताबाई म्हणाल्या, 'कुठल्याही कलेविषयी एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच शास्त्र होऊ शकेल. एखाद्या सुंदर चालीबद्दल अधिक जाणून घेण्याच्या दृष्टीने, त्याबाबतचे विश्लेषण होण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे शास्त्र आपल्या उपयोगी पडू शकेल. तरी कुठल्याही सुंदर गोष्टीचं, कलाकृतीचं परिपूर्ण असं शास्त्र होऊ शकत नाही. एखाद अत्यंत मनोवेधक गीत, कसं साकार होत असेल? गीतकाराचे शब्द, संगीतदिग्दर्शकानं दिलेली चाल आणि गायक किंवा गायिकेच्या कंठाचा गोडवा आणि उच्चारातील वैशिष्टयपूर्णता या सर्वांचा असा एक उत्कृष्ट मिलाफ होतो आणि ते गीत निर्माण होते;' असा हा मिलाफ होणे ही पुष्कळदा योगायोगाची गोष्ट असते. इथे उपस्थित असलेल्या (सुधीर फडके, श्रीनिवास खळे, हृदयनाथ मंगेशकर आदी संगीतदिग्दर्शक या समारंभाला आवर्जून उपस्थित होते.) श्रेष्ठ संगीत दिग्दर्शकांना आपण विचारलं की,

तुमच्या अतिशय गाजलेल्या गीतांच्या चाली तुम्हाला कशा सुचल्या ? तर मला असं वाटतं की, एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच त्यांना त्या गोष्टीचं विश्लेषण करता येईल. त्याच्या पलीकडं मला नाही वाटत की, ते आणखी जास्त काही उलगडू शकतील. गीतलेखन किंवा चाल देणे या गूढ प्रक्रियेमागे आणखी बरेच किती तरी अनाकलानीय असे असते, ते या विश्लेषणापलीकडचे असते. त्या प्रत्यक्ष घटनेमागे हा योगायोगाचा भागच असतो. मला तर वाटतं, तो एक साक्षात्कारच असतो. चाल देणाऱ्याप्रमाणेच गाणाऱ्याच्या दृष्टीनेही चाल समजून गातानाचा तो क्षण साक्षात्काराचाच असतो. आणि म्हणूनच 'शब्दप्रधान गायकी'चं शास्त्र बनविता येईल किंवा नाही याबद्दल मी साशंक आहे. मात्र त्या दिशेनं उचललेलं हे पहिलं पाऊल म्हणून या पुस्तकाला ऐतिसिक असं महत्त्व आहे.'

'जसं हे पुस्तक मला महत्त्वाचं वाटलं तशीच पाडगावकरांची प्रस्तावनाही. कारण तीही अतिशय विचारपूर्वक लिहिली आहे आणि काही महत्त्वाचे मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत. त्यातला एक मुद्दा म्हणजे गीतकाराने आधी गीत लिहावे, मग संगीतदिग्दर्शकाने त्याला चाल द्यावी हा उपक्रम त्यांना सयुक्तिक वाटतो. या त्यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत नाही. आधी योगायोगाने चांगले गीत लिहिले गेले आणि नंतर संगीतकाराने चाल दिली तर ती उत्तम कलाकृती होतेच; पण पुष्कळदा याच्या उलटही होऊ शकते. माझा स्वतःचा जो या क्षेत्रातला अनुभव आहे त्यावरून असं वाटतं की, चांगल्या चालीमुळंसुद्धा चांगलंसं गीत सुचण्याची बरीच शक्यता असते. याचं एक कारण मला असं वाटतं की, मराठीमधले रचनाबंध फार मोजके आहेत. माडगूळकरांसारख्या गाजलेल्या गीतकाराच्या अनेक गीतांची वजने, कालखंड ही सारखीच आहेत. हिंदी चित्रसृष्टीमध्ये पाहिल्यास चालींवरून गीते केल्यामुळे वजने, स्वरबंध याबाबतची विविधता आढळते.'

पुढील वक्ते श्री. सुधीर फडके यांना आपले विचार व्यक्त करण्यास सांगण्यापूर्वी सभागृहाबाहेर व्हरांड्यात उभ्या असलेल्या श्रीमती विजयालक्ष्मी देव यांना आत येण्याची विनंती करताना बापट म्हणाले, 'आपल्याला माहीतच आहे की, थोर पुरुषांच्या कर्तृत्वामागे...' इथे बापटांनी एक अर्थपूर्ण पॉज् घेतला आणि सभागृहामध्ये जो काही हशा उसळला ! तेवढ्यात बापट पुढे म्हणतात, 'माझ्या शेजारी बसलेले पाडगावकर म्हणताहेत की, कुठल्या तरी बाईची शक्ती उभी असते !' मग तर आणखीनच हशा ! 'अर्थात त्यांचा अनुभव तसा असेलही !' बापटांची आणखी पुस्ती !

## बाबूजींचा सूर

पुस्तक जराही खाली न ठेवता आपण ते एका बैठकीत वाचून काढल्याचे सांगून श्री. सुधीर फडक्यांनी पुस्तकातील शब्दप्रधान गायकीचे शास्त्र कसे बनवले आहे, या उत्सुकतेपोटी 'मागे वळून पहाताना' या प्रकरणाचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, 'मात्र सबंध पुस्तक वाचताना मला अपरिहार्यपणे त्याच्यामागचा हा सूर जाणवला की, कवी हाच सर्वश्रेष्ठ, नंतर संगीतकार आणि नंतर गायक; पण प्रथम शब्द आणि नंतर स्वर हे मला तितकसं मान्य नाही. कारण प्रतिभा जशी कवीला असते तशीच संगीतकाराकडेही असू शकते; नव्हे, असतेच. कवीला जसे शब्द सुचतात तसे संगीतकाराला स्वर सुचतात, विशिष्ट वातावरणामध्ये, विशिष्ट प्रसंगात स्वर त्यालाही सुचतात. ते स्वर तो स्वरलिपीमध्ये बांधू शकतो. स्वरलिपी अवगत नसली तरी स्मरणात ठेवू शकतो आणि अशा स्वरसमुच्चयातून कवी गीताला शब्द देऊ शकतो व तेही तितकंच सुंदर गीत असू शकतं.' आपल्या मुद्द्याच्या स्पष्टीकरणार्थं फडक्यांनी 'बोला अमृत बोला' आणि 'स्वर आले जुळुनी' या दोन गीतांची आठवण करून दिली. 'संगीतकारही गीतकाराइतकाच योग्यतेचा आहे, हे आवर्जून सांगत असतानाच इथे मला गीतकाराचा जराही अधिक्षेप करावयाचा नाही' हेही फडके अत्यंत विनम्रतेने सांगत होते.

सुरुवातीला 'आपण फार वेळ बोलणार नाही' असं बाबुजी म्हणाले होते; पण विषयच हा असा आव्हानात्मक आहे की, त्यामुळे त्यांनी आपले गुणग्रहण व नंतर आपली कैफियत तपशीलवार मांडली. 'एखाद्या ठाणबन्द घोड्याला दुसरा घोडा धावत असताना जे होतं, विशेषतः ठाणबन्द घोडा उमदा असला तर, तशीच अवस्था पाडगावकरांची झाली होती !' असं बोलून बापटांनी वातावरणातला ताण जरा हलका केला आणि पुढे ते म्हणाले, 'संगीतकार जसा मोठा असतो, तितकाच कवीही मोठा असतो, हे बाबूजी इतकं विनयानं का म्हणताहेत ते मला कळत नाही. माझ्या दृष्टीनं संगीत ही इतकी शुद्ध आणि उत्कृष्ट कला आहे, 'शब्दाशिवाय संवादिजे' अशी शक्ती तिच्यात आहे, हे कवीच मानतात. मर्ढेकरांनी सांगितलं आहे की. संगीताइतकी विशुद्ध कला दुसरी नाही.' मग पुन्हा बापट मिस्किलपणे म्हणतात, 'आता एवढा आपला सन्मान कवींनी केल्यानंतर कवींचंही थोडंसं स्थान आपणही ओळखलं पाहिजे !' पुन्हा सभागृहात एकच हशा उसळला. 'पाडगावकरांच्या प्रस्तावनेबद्दल बाबुजींचा काही तरी गैरसमज झाला असावा, असं मला वाटतं; पण आत्ताच त्याबद्दलच्या उत्तरप्रत्युत्तरामध्ये न पडता मी आता प्रा. अशोक रानडे यांना बोलण्याची विनंती करतो. आपल्याला गाणारी माणसं आवडतात; पण गाण्याचं शास्त्र करणाऱ्यांबद्दल थोडी दहशत असते ! पण ज्या अर्थी रानडे माझ्याकडे मधूनमधून येतात त्यावरून ते रसिकही आहेत !' बापटांची पुढे पुस्ती !

रानड्यांनी आपल्या भाषणाला अतिशय प्रसन्नपणे सुरुवात केली. ते म्हणाले, 'बापटांना आजवर मी माझे मित्र मानत होतो; पण ते असे विश्वासघातकी असतील असं मला वाटलं नव्हत. गाण्या-बजावणाऱ्यांच्या सभेत असून त्यांनी मोठा दंडक पायदळी तुडवला आहे. सर्वांत कनिष्ठ माणसाला आधी बोलायला द्यायला हवं होतं. मला सर्वांत शेवटी बोलायला सांगून त्यांनी कीर्तनातल्या निरूपणाच्या भागातल्या पालुपदासारखी माझी स्थिती केली आहे !' श्रोत्यांकडून स्वतःच्या विनयाला छानशी दाद घेत रानडे म्हणाले, 'शांताबाईंनी एवढा चढा सूर लावला आणि बाबूजींनी एवढं त्याचं विस्तारण केलं, मध्ये बापटांनी पुन्हा तुकडे मारले, पाडगावकर त्यांना न रहावून वाहवा देत होते; पण ती वाहवा नसून चिथावणी होती ! मी सगळं नीट बघत होतो आणि या सर्व अन्यायात हे सगळे सहभागी झालेले पाहून मनाला मोठा विषाद वाटला ! देव आमचे जुने मित्र आहेत. अनेक

नाऱ्यांनी माझा त्यांचा संबंध येतो. रेडिओ सोडलेले आम्ही काही भाग्यवंत इथे आहोत! तेवढे भाग्यवंत नसलेले म्हणून आम्ही मधून मधून त्यांची कीवही करीत असतो! पण आज मात्र त्यांचा हेवा करावासा वाटतो, कारण गुणीजनांची चर्चा करायला गुणीजन जमावेत, तसा आजचा हा श्रोतृवृंद आहे.

'देवांनी अनेक प्रश्नांना तोंड फोडले आहे. गाण्या-बजावण्याविषयी कलावंतांनीच बोलले पाहिजे. खिडकीतून जे संगीताकडे बघतात त्यांना यावर लिहिण्या-बोलण्याचा अधिकार नाही. शांताबाई, पाडगावकर यांना संगीताचा कान आहे म्हणूनच ते सुंदर गीते लिहू शकतात. आमचे संगीतकार विनाकारण विनयशील का? संगीत हा ज्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे, ज्यांच्या श्वासोच्छ्वासातही संगीतच चालतं त्या लोकांनी जर संगीतावर लिहायचे नाही तर दुसऱ्या कुणी लिहायचं? केशवराव भोळे हा एक अपवाद सोडला तर आपल्या संगीताविषयी लिहिणारा एकही संगीतकार नाही. त्या दृष्टीने देवांनी हे फार चांगले पाऊल उचलले आहे.

## आधी गीत का चाल?

'खळेयांशी एकदा मी आणि पाडगावकर चर्चा करायला बसलो असतानाही हा प्रश्न निघाला होता, प्रथम काय? गीत की चाल? पाडगावकरांना हा प्रश्न सारखा डाचत असतो. तो प्रस्तावनेत उमटला आहे, हे ठीकच आहे. मला असं वाटतं की, प्रत्येक संगीतकाराला दरवेळी एकाच तऱ्हेनं चाल सुचते असं तरी का म्हणावं? कधी कधी त्याला केवळ लयीचं चलन समोर येतं म्हणून तो चाल बांधायला उद्युक्त होतो. कधी कधी त्याला सुरावट सुचते. कधी कधी त्यालासुद्धा शब्द जाणवतात. शेवटी शब्द म्हणजे नादरूपच आहेत. या सर्व नादरूपांमध्ये कवी काय किंवा संगीतकार काय, हा सारखा बुडून असतो. कलावन्त यामध्ये जितका खोल जाईल तितकी त्याला अधिक रूपं जाणवतील. कवीला कविता का कराव्याशा वाटतात? तर हे नादाचं पडलेलं कुतूहल, हेच त्याचं कारण आहे. नादाची काही रूपं सुरावट देत असतात, नादाची दुसरी रूपं आम्ही शब्द वाचतो तेव्हा मिळतात; पण शब्द वाचण्याची जेव्हा सारखी आमच्यावर जबरदस्ती होते तेव्हा शब्द नीट ऐकायला मिळत नाही, म्हणून आमुसलेले लोक कविता करायला लागतात! देवांसारखा संगीतदिग्दर्शक कुठे तरी मनात म्हणत असला पाहिजे की, हल्ली सारख्या कविता लिहिल्या जात आहेत. लिहून दर वेळी कविता निर्माण होणं, हे आपल्या परंपरेला मानवणारं नाही. संगीत असो, तत्त्वज्ञान असो, सर्वत्र आमची मौखिक परंपरा चालू असे. गुरु-शिष्य समोरासमोर बसून बोलण्यातून ज्ञानदान व ज्ञानग्रहण करीत असत. शब्दाचं नादरूप हे बोलणं व कानानं ऐकणं यातूनच जाणवणारं आहे. लिहिणं हे जे नंतर आलं ते वकिली खात्यासारखं आहे. पूर्वी 'शब्द दिला' म्हणजे तो लिहावा लागत नसे. आज तो बाँड पेपरवर लिहिला गेल्याशिवाय त्याचा भरवसा धरता येत नाही! — तर कानाला जाणवणारं शब्दाचं नादरूप हे आपण विसरतो आहोत, आपण कान गमावून बसलो आहोत. शांताबाई मघाशी म्हणाल्या की, आम्हाला नवीन चलनं मिळायला हवीत. आम्ही त्या छंदामध्ये, त्याच त्या वृत्तांमध्ये अडकतो, त्याचं बंधन पडतं. मी त्यांना सुचवीन की, तुम्ही थोडं शास्त्रीय संगीताकडे अधिक पहा. त्यात तुम्हाला खूप चलनं मिळतील. संगीतामध्ये पूर्वी १३५ ताल होते. आता लोक फक्त १० वापरतात आणि बहुतेक वेळा 'एक तालात'च गातात! याला कारण हेच की, आम्ही कान गमावून बसलोत. आम्हाला मात्र लिहिलेल्या दिसतात; पण त्या कानांना जाणवत नाहीत. त्या जाणवायला हव्या असतील तर आम्हाला कान पुन्हा कमवायला हवेत. पाडगावकर आणि बापटांची क्षमा मागून मी असं म्हणेन की, आमच्या मराठी कवितेत किती कवींना कान आहेत असं दिसतं? त्यांना फक्त डोळे आहेत. नादाची किती रूपं या लोकांनी जोखली आहेत? यांना वाद्यं किती दिसतात? संगीतातले प्रकार किती जाणवतात? यांच्या कवितेत रागरागिण्या कुठल्या येतात? ठराविक नावे येतात. तीसुद्धा त्यांचे नादरूप जाणवल्यामुळे येत नाहीत, तर ती नावे फॅशनेबल झालेली असतात म्हणून येतात. यापलीकडे त्यांना संगीताचे कान नाहीत, संगीतकारांना नृत्याचे कान नाहीत आणि नृत्यकारांना चित्रकलेचे डोळे नाहीत, अशी आपल्या मराठी कलावंतांची स्थिती झालेली मला तरी जाणवते.'

रानडे पुढे म्हणाले, 'पुस्तक लिहिणं म्हणजे चावडीवर येणं. हे मला माझ्या कलेविषयी म्हणायचं आहे, त्यातलं भलंबुरं तुम्ही जोखा, असं आव्हान त्यात असतं. हे आव्हान देवांनी दिलं आहे, हे फार योग्य झालं आहे. हे पूर्वीच व्हायला हवं होतं. हे सर्वच कलावन्तांनी केलं पाहिजे. पाडगावकरांनी प्रस्तावना इतकी चांगली लिहिली आहे की, मी त्यांना म्हणालो की, तुम्हीही समीक्षात्मक लेखन का करीत नाही? गीतकारांवर का लिहीत नाही? काही गीतकार हे खऱ्या अर्थाने गीतकार का व काही शब्दजुळवे का, हे आपल्याला कुणी सांगितलं आहे? गीतकारांमधल्या श्रेष्ठतेबद्दल कुणी चर्चा केली आहे?'

रानड्यांच्या या नर्मविनोदांनी सजलेल्या आणि विचार करायला लावणाऱ्या भाषणानंतर, बापटांनी पुस्तकाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर केले व गंभीर आवाजात पुस्तकाची अर्पणपत्रिका वाचली. टाळ्यांचा कडकडाट झाला. बापटांनी पुस्तकाची पहिली प्रत आशा भोसलेंच्या हाती दिली. श्री. यशवंत देवांनी हे पुस्तक आशाबाईंनाच अर्पण केले आहे. आशाबाई बोलायला उठल्या. अपूर्व शांतता पसरली. सुमधुर आवाजात आशाबाईंनी इतकी सुंदर, अनौपचारिक अशी सुरुवात केली... 'मी आजपर्यंत कुणाचा या जगात हेवादावा केला नाही, भगवंताने तशी माझ्यावर वेळच आणली नाही. मी आपली अल्पसंतुष्ट बाई आहे. एवढं गाते पोटापुरती आणि मी संतुष्ट आहे; पण आज मला तुम्हा लोकांचा भयंकर हेवा वाटतो आहे! या खुर्चीवर बसण्यापेक्षा तुमच्याजवळ बसण्यात जी शांती मिळाली असती...फार सुरेख आहे ती. मला माहीत नव्हतं की, इथे असा शाब्दिक आखाडा असणार आहे! हा इथे असलेला प्रश्न म्हणजे, अंडं आधी की कोंबडी? शिव मोठा की शक्ती? तुम्हीच मला याचं उत्तर द्या. काव्य आणि संगीत हे खरं तर शिव-शक्तीसारखंच एकमेकांशी जुळलेलं आहे, अभिन्न आहे!' मिस्किलपणा आणि विनम्रता याची कमाल करीत आशाबाईंनी आपल्या गुरूंनी आपल्याला काय

दिलं, काय शिकविलं ते सांगत होत्या, प्रात्यक्षिकांसह ! 'त्या तिथे, पलिकडे, तिकडे...' 'ये रे घना, ये रे घना' आणि 'नाच नाचुनी अति मी दमले,' 'विसरशील खास मला' या ओळी आपल्या गुरूंच्या गाण्याच्या नकला करीत अशा काही म्हंटल्या की, हसून हसून पुरेवाट होत असतानाच मनात आदर दाटून येत होता. आरती प्रभूंचा उल्लेख त्यांनी हळुवारपणे केला ! आशाबाईंचे हे भाषण प्रत्येकाने प्रत्यक्ष अनुभवायलाच हवे, असे होते.

नागपूरचे एक नामवंत 'देव'भक्त कवी मधुकर पारळकर यांनी स्वतः काढलेले एक चित्र देवांना अर्पण केले व मग वसंत बापट आपल्या अध्यक्षीय भाषणाला सुरवात करणार एवढ्यात सुधीर फडक्यांनी काही खुलासा करण्याची इच्छा व्यक्त केली. फडके म्हणाले, 'अकारणच काही वाद निर्माण झाल्यासारखं वातावरण झालं आहे. वाद नाही. कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ असा मुद्दा मी मांडलेला नाही. कवी श्रेष्ठ हे निःसंशय, संगीतकार तितकाच श्रेष्ठ हेही निःसंशय, एवढंच माझं म्हणणं आहे. माडगूळकर, शांताबाई यांच्या अनेक गाण्यांना मी चाली केल्या आहेत, याउलट मी चाल दिल्यानंतरही कवींनी उत्तम गीते लिहिली आहेत. गायक, संगीतकार हे तितक्याच तोलामोलाचे लागतात; त्याशिवाय कोणतेही गीत 'उत्तम' होऊ शकत नाही. पाडगावकरांनी प्रास्ताविकात व्यक्त केलेल्या मताशी मी बऱ्याच प्रमाणात सहमत आहे. फक्त अगोदर कोण, नंतर कोण हा वाद असू नये असं मला वाटतं.'

## बापटांचे रंगतदार भाषण

बापटांनी सुरुवात केली. 'बाबूजींनी केलेल्या खुलाशानंतरही खरं तर हा प्रश्न शिल्लकच आहे, असं मी मानतो आणि तसं असण्यात गैर काही नाही. कारण हे काही एका विशिष्ट संगीतकाराचं किंवा कवीचं असं वैयक्तिक भांडण नाही. हा तात्त्विक प्रश्न आहे. त्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न ही अधिकारी मंडळी करीत जातील तितकं त्याचं उत्तर मिळण्याचीही शक्यता आहे. या इथल्या भाषणांना आशाबाई थोड्या बिचकल्या आणि म्हणाल्या की, इथे हा आखाडा चालणार आहे, याची मला कल्पना नव्हती. या आखाड्याची आठवणसुद्धा त्या कोल्हापूरला असल्यामुळे झाली असणार ! वास्तविक ही सगळी शाब्दिक मारामारी सुरू असताना आम्ही इथे केवळ हास्यमुख असे बसलो होतो. मात्र ब्राह्मण असलो तरी खवचट हसत नव्हतो ! 'उच्चवर्ण आम्ही ब्राह्मण असुनी तमाशाचा करतो धंदा' हे बिरुद आम्हीही सांभाळलेलं आहे !

'शांताबाईंनी सुरुवातीला नेहमीच्या सौजन्याला अनुसरून अत्यंत विनम्र असं भाषण केलं आणि त्या म्हणाल्या की, संगीतातलं आपल्याला काही कळत नाही. ते काय ताल असतात... वगैरे. त्या कधी तरी सावकाशीनं माझ्याकडे आल्या की, आम्ही दोघंही आमचं अज्ञान शेअर करू ! मुख्य मुद्दा उपस्थित झाला की, शब्दप्रधान गायकीचं शास्त्र होऊ शकेल की नाही ? तर त्याचं एक उत्तर असं देता येईल की, जे जे अमूर्त म्हणून असतं, त्या कशाचंच खऱ्या अर्थानं शास्त्र होऊ शकत नाही. अमूर्ताला समूर्त करण्याचा प्रयत्न म्हणजेच कलासाधना असते. जे स्वर गायकाच्या गळ्यातून उमटतात किंवा संगीतकाराच्या चालीमधून येतात ते आधी त्यांच्या मनामध्ये जन्म घेत असतात. तेथे ते अमूर्त असतात आणि अमूर्त स्वर जेव्हा समूर्त होत असतात तेव्हा खरं तर ते थोडे बिघडतात, हे सर्व संगीतकारांनासुद्धा माहीत आहे. म्हणूनच भास्करराव तांब्यांनी म्हणजे—पुन्हा एका कवीनेच — असंच एक शास्त्र सांगून ठेवलेलं आहे की, रंग माझ्या चित्रांच्या आड येतात, शब्द माझं काव्य बिघडवितात आणि स्वरच माझ्या गायनाच्या आड येतात. कारण माझ्या मनात जे आहे ते हे नव्हे... हे प्रत्येक प्रतिभावंताला समजत असते.'

याच कारणामुळे प्रसिद्ध शिल्पकार रुबायाने आपण निर्माण केलेली मूर्ती कशी छिन्नभिन्न केली, हे सांगून गडकऱ्यांनी केलेल्या एका मुलीचे वर्णन कोणत्या शब्दात केले त्याचा उल्लेख बापट करतात— 'चिमुकली' ह्या कवितेतील मुलीचं सौंदर्याचं वर्णन करताना गडकरी म्हणतात, 'ब्रह्माच्या मनामधे जे होतं... ते ही चिमुकली आहे; पण ब्रह्मासुद्धा पार्थिव पातळीवर जेव्हा येतो, पंचमहाभूतांच्या सहाय्यानं सृष्टीची निर्मिती करायला लागतो, तेव्हा त्याच्या मनामध्ये जे असतं, त्याची जी मानसी तो सुद्धा ती साकारू शकत नाही .. तेव्हा कलेच्या क्षेत्रात शास्त्राची एक मर्यादा असते. साहित्याच्या क्षेत्रातही 'काव्यशास्त्र' बनविण्याची खटपट किती वर्षं सुरू आहे आणि तरीही काव्य म्हणजे काय, याची व्याख्या करणं अजून जमलेलं नाही! २००० वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत; पण ही कवितेची व्याख्या करता येत नाही ! 'प्रतिभासाधन' सारखे ग्रंथ निर्माण होतात, ... शास्त्र नाही निर्माण होत.'

संस्कृतमधील एक गोष्ट बापट सांगत होते. 'दोन मैत्रिणी एकमेकींशी बोलत होत्या. नुकतीच त्यांची लग्ने झालेली होती. पहिली म्हणाली, 'अग, काय सांगू तुला, सगळंऽऽ शास्त्र स्वारीला अगदी पाठ आहे.' आता कसलं शास्त्र ते तुम्ही ओळखालच ! 'तर प्रथम काय, मग काय, सगळं सगळं त्यांना अगदी अवगत आहे तशी ती दुसरी मैत्रीण म्हणते, 'ते चतुर खरे; पण त्यांच्यापेक्षा तू खरी चतुर दिसतेस. अग, तुझ्या हे सगळं लक्षात कसं राहिलं ? माझं जर विचारशील तर...त्याचा स्पर्श मला झाला... त्यानंतरचं मला काहीच आठवत नाही...!' कुणाचा प्रणय अधिक उत्कट... हे सांगायला नकोच... तर एकूण काय... हा शास्त्रापलीकडचा विषय आहे.'

बापटांचे भाषण खूपच रंगत चालले होते. अनेक उदाहरणे आपल्या नाट्यमय वक्तृत्वशैलीत देऊन ते आपले म्हणणे श्रोत्यांना पटवीत होते. पु. शि. रेगे यांचा 'शब्दप्रधान गायकी हा एक हास्यास्पद शब्दप्रयोग आहे. कारण गायनात जर शब्द येऊ लागले तर संगीतातले संगीतत्व भ्रष्ट होते,' हा टोकाचा विचार सांगून बापट म्हणाले, 'जीवनात कलानंदाचे असे टप्पे ज्यांना पाडता येतील ते धन्य होत ! मला तर वाटतं, या कलांमध्ये असे काही टप्पे नाहीतच. म्हणूनच आपण जेव्हा एखाद्या कलाविषयाविषयी समीक्षा करू लागतो तेव्हा आपली फे फे उडते किंवा मग आपण भिन्नभिन्न कलाविषयक शब्दांचा आधार घेऊ लागतो. एखाद्या सुंदर चित्राचं वर्णन करताना आपण म्हणतो, वा ! Its' a poem in colours! नाटकाची रचना कशी आहे, तर – Architectonic ! आणि काव्य म्हणजे शब्दांनी निर्माण झालेलं चित्र ! तर या अशा सर्व

# प्राप्तीकरदात्यांनो !
# आदेशाची वाट पाहू नका. त्यापूर्वीच जबाबदारी पार पाडा !

यापूर्वी प्राप्तीकर भरण्याच्या दृष्टीने आपल्या प्राप्तीची आकारणी झाली असली तर आता आगाऊ कर भरण्यासाठी प्राप्तीकर अधिकाऱ्याकडून आदेश येण्याची वाट पाहू नका. आपण स्वतःच आठवण ठेवून आगाऊ कर भरावयास पाहिजे.

## काय करायचे काय टाळायचे

- प्राप्तीकर अधिकाऱ्याकडून आदेश येण्याची अपेक्षा करू नका अथवा वाट पाहू नका.
- पहिला हप्ता भरण्याची तारीख येण्यापूर्वी, आगाऊ कर किती भरावयाचा यासंबंधात ठरलेला फॉर्म नं. '२८ ए' वर तपशील देऊन, तो फॉर्म आपल्या प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे दाखल करा आणि त्याप्रमाणे आगाऊ कर जमा करा.
- तपशिलात जी एकूण प्राप्ती दाखवावयाची आहे त्यावर भरावयाच्या कर–रकमेपेक्षा, आपल्या अंदाजी चालू प्राप्तीवरील आगाऊ कराची रक्कम कमी आहे, असे जर आपणास वाटत असेल तर, वरील तपशील पाठवू नका. पण आपल्या अंदाजाप्रमाणे चालू प्राप्ती आणि त्यावर भरावयाची आगाऊ कराची रक्कम हा तपशील ठराविक फॉर्म नं. २९ वर भरून तो फॉर्म प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे पाठवा.
- आपल्या एकूण प्राप्तीपैकी ७५ टक्के अथवा अधिक प्राप्ती ज्या व्यवसायांतून होते, त्या व्यवसायांचे आर्थिक वर्ष जर ३१–१२–१९७८ नंतर संपत असेल, तर, आगाऊ कराचा पहिला हप्ता १५ सप्टेंबर १९७८ पूर्वी भरण्यात आला पाहिजे.

  जर आगाऊ कराचा पहिला हप्ता आपणास १५ सप्टेंबर ७८ पूर्वी भरावयाचा असेल तर, जशी गरज असेल त्याप्रमाणे फॉर्म नं. २८ ए वर अथवा फॉर्म नंबर २९ वर आपला तपशील पाठविण्याची तयारी करा.
- जर आपणास प्राप्तीकर अधिकाऱ्याकडून आदेश आला असेल तर त्याप्रमाणे आगाऊ कर जमा करा. प्राप्तीकर अधिकाऱ्याने जी प्राप्ती गृहीत धरून, त्यावर आगाऊ कराची मागणी केली आहे त्यापेक्षा जर आपली चालू प्राप्ती कमी होणार असेल आणि चालू आर्थिक वर्षात आपणाकडून आगाऊ कर म्हणून प्राप्तीकर अधिकाऱ्यातर्फे मागणी करण्यात आलेल्या रकमेपेक्षा, आपण भरावयाची आगाऊ कराची रक्कम आपल्या अंदाजाप्रमाणे कमी असेल तर, अथवा अन्य काही कारण असेल तर, आपल्या चालू प्राप्तीचा अंदाज आणि त्यावर भरावयाची आगाऊ कराची रक्कम, ही माहिती ठराविक फॉर्म नं. २९ वर भरून तो फॉर्म प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे पाठवा आणि त्या तपशिलाप्रमाणे आगाऊ कर जमा करा.
- प्राप्तीकर कायद्याखाली जर यापूर्वी आपल्या प्राप्तीची आकारणी झाली असेल तर आपण अपेक्षित चालू प्राप्ती व त्यावर भरावयाची आगाऊ कराची रक्कम ही माहिती फॉर्म नं. २९ वर भरून, ही माहिती प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे पाठवा आणि त्याप्रमाणे कर जमा करा. खालील कोष्टकात दाखविल्याप्रमाणे चालू प्राप्ती त्यापेक्षा अधिक झाल्यास आगाऊ कर भरण्याची जबाबदारी आपणावर येते.

  रु. २५०० – कंपनी अथवा स्थानिक प्राधिकरण असल्यास
  रु. ३०,००० – पंजीकृत व्यापारी संस्था असल्यास
  रु. १०००० – इतर श्रेणीतील सर्व प्रकरणात
- चालू प्राप्ती म्हणजे, पुढच्या आकारणी वर्षात, निरनिराळ्या मार्गांनी झालेली एकूण प्राप्ती. भांडवली नफा आणि लॉटरी, शब्दकोडी, शर्यती, पत्त्यांचे खेळ, सट्टा वगैरेपासून झालेल्या प्राप्तीचा यात समावेश नसतो.

  आपला आगाऊ कर वेळेवर भरण्यास विसरू नका.
  दोन गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या

- **योग्य चालान फॉर्मची निवड आणि तो संपूर्ण आणि सत्य भरणे.**
- **आगाऊ कर वेळेवर जमा करणे.**

निवेदक,
**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**
**( रिसर्च, स्टॅटेस्टिकल, अँण्ड पब्लिकेशन )**
**इन्कम टॅक्स डिपार्टमेंट**
**नवी दिल्ली – ११०००१**

( davp 78 / 15 )

कला सरमिसळ होत असतात. कारण अंती त्या एकाच आनंदब्रह्मात विलीन होतात ! या सर्व कला म्हणजे त्या आनंदब्रह्माकडे नेणारे मार्ग !'

बापटांच्या भाषणानंतर यशवंत देव आपले मनोमत व्यक्त करण्यासाठी उठले. 'कलावन्ताला जेव्हा उत्कटपणे रसिकापर्यंत काही पोचवायचं असतं त्या वेळी त्याला माध्यम हे सापडतंच. गीत सादर करताना त्याच्या निर्मितीला कारण झालेला गीतकार, संगीतकार व गायक यांना आपण योग्य रीतीने त्यातून बाजूलाही कसे व्हायचे, त्यातला 'मी' कसा वगळायचा हेही कळणं फार महत्त्वाचं आहे. मी शब्दप्रधान गायकीत जे मांडलं आहे ते माझ्या अनुभवाचे बोल आहेत. ते मांडताना मी कुठलीही तडजोड केलेली नाही. आपण अंतर्मुख होऊन त्यावर विचार केलात तर आपल्याला माझ्या बहुतेक सर्व म्हणण्याची सत्यता पटू शकेल. माझं असं म्हणणं नाही की, This is the last word, I might say, this is the first word, please accept it.'

भाषणांचा हा रंगलेला पूर्वरंग संपायलाच खूप उशीर झाला होता. त्यानंतरच्या उत्तररंगांत पाडगावकरांनी सादर केलेला देवांच्या गीतांचा शब्दप्रधान गायकीच्या प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम मग आठ-दहा गीतांतच संपवावा लागला खूप दिवसांनी अतिशय निर्मळ वातावरणात रंगलेला एक सुंदर कार्यक्रम अनुभवायला मिळाल्याच्या समाधानात श्रोत्यांनी छबिलदास सभागृह सोडले.

—उषा मेहता

---

# अवती-भवती : पृष्ठ ८ वरून

होते की अखेरीस त्यांनी चिडून फोनवर विचारले, 'मी काम काय करावे अशी तुमची अपेक्षा आहे ? इतके झाल्यावरही मी तुमचे जेवणाचे आमंत्रण स्वीकारावे असे तुम्हाला वाटते तरी कसे ?' या अखेरच्या संभाषणानंतर मात्र तर्नेजा यांनी त्यांच्याशी संपर्क साधलेला नाही.

खुशवंतसिंग १९६९ साली विकलीचे संपादक म्हणून आले त्या वेळी या साप्ताहिकाचा खप साठ हजाराच्या घरात होता. त्यांनी या प्रतिष्ठितेचा बुरखा पांघरलेल्या साप्ताहिकाला एका मुक्त व्यासपीठाचे स्वरूप दिले. विकलीच्या बदलत्या स्वरूपावर आणि संपादक खुशवंतसिंग यांच्यावरही कडवट टीका करणारी कडवट पत्रेही त्यांनी प्रसिद्ध केल्याने विकलीच्या प्रामाणिक धोरणांची वाचकाला कल्पना आली. आस्ते आस्ते विकलीचा पसारा वाढत गेला. विकलीभोवती विणला गेलेला कोश गळून पडला. खुशवंतसिंग यांचे खुसखुशीत संपादकीय पान, सचित्र वार्तापत्रे, माहितीपूर्ण लेख, याबरोबरच विकलीचे स्वरूप बदलत चालले. विविध जातीजमातींवरील लेख, विविध शहरांवरील लेख आणि अन्य अनेक नाविन्यपूर्ण लेखमाला सादर करून त्यांनी विकलीचे स्वरूपच बदलून टाकले. विकलीचा खप झपाट्याने वाढू लागल्यावर मालकमंडळी त्यांच्यापाठी भक्कमपणे उभी राहिली. आज त्यांची ज्यांच्या सहीने हकालपट्टी झाली ते तर्नेजा खुशवंत आपल्याला धाकट्या भावाप्रमाणे असल्याचे सांगू लागले. सरदारजींनी मागणी करायची आणि मालकांनी ती पूर्ण करायची असा परिपाठ पडला. द्विवर्षीय करारनामा प्रत्येक वेळी उत्साहाने पुढे रेटण्यात आला. विकलीचा खप प्रत्येक अंकाबरोबर वाढतच होता. ६० हजार खपाचे हे साप्ताहिक गेल्या नऊ वर्षांत खुशवंतसिंग यांनी चार लाखांवर नेऊन ठेवले. आणीबाणीच्या काळामधील आणि नंतरचीही त्यांची धोरणे पसंत नसली तरीही विकलीच्या खपावर त्याचा परिणाम झाला नाही. एक तर विकली हे काही राजकीय मतपत्र नव्हते आणि राजकीय लिखाणात एक बाजू उचलून धरली गेली असली तरी दुसरी बाजूही झाकली जाणार नाही याची दक्षता घेण्यात येत होती. संपादकाचे स्वतःचे मत अंकावर ठसठशीतपणे उमटतेच, तसे ते विकलीच्या संदर्भातही उमटत होतेच; पण तरीही व्यापक व्यासपीठ असे जे स्वरूप विकलीला देण्यात आले होते त्याला तडा न गेल्याने विकलीवरील वाचकाचा लोभ टिकून राहिला. राजकीय मजकुराखेरीज प्रसिद्ध होणारा अन्य मजकूर व चित्रे यावर वाचक खूष होतेच. त्यामुळे याच गटाच्या दैनिकांच्या खपाच्या बाबतीत जो उतरती मागणी दिसून आली ती विकलीच्या बाबतीत दिसली नाही.

सन्डे या कलकत्त्याहून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकाने स्वतः खुशवंतसिंग यांनी लिहिलेला फेअरवेल या नावाचा लेख छापला आहे. या प्रतिष्ठित साप्ताहिकाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकून आपण त्याला सर्वस्पर्शी कसे बनविले याचा तपशील त्यांनी दिला आहे. १९८० साली या साप्ताहिकाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्या वेळेपर्यंत तरी विकलीबरोबर असावे असे वाटण्याएवढे यश त्यांनी या साप्ताहिकाला मिळवून दिले आहे. केवळ दोन वर्षांसाठी आलेले खुशवंतसिंग या साप्ताहिकाच्या आणि मुंबईच्याही कसे प्रेमात पडले आणि आता आपण या साऱ्या आनंदाला कसे मुकणार आहोत याचे खुसखुशीत वर्णन त्यांनी आपल्या चुरचुरीत शैलीत केले आहे. याच अंकामध्ये त्यांचा मुलगा राहुलसिंग याने आपल्या वडलांवर कसा अन्याय झाला याचे विवेचन करणारा एक लेख लिहिला आहे. मुलाने आपल्या कर्तृत्ववान वडलांबद्दल तो लेख लिहिला असल्याने आणि त्यांच्या निवृत्तीबद्दल, विशेषतः ज्या पद्धतीने त्यांची हकालपट्टी करण्यात आली त्याबद्दलची मते आणि कारणे या लेखात आहेत. हे सारे प्रकरण प्रत्यक्ष त्यांच्या वडलांशी निगडित असल्याने त्यात असावा तेवढा निःपक्षपातीपणा नसेल हे खरे मानले तरी नुकसानीत चालणारे हे साप्ताहिक सालिना ४० लाख रुपयांचा नफा मिळवून देत असताना या यशाचा प्रमुख शिल्पकार असलेल्या संपादकांची, फायद्या-तोट्याच्या सरकत्या आलेखावर बारीक लक्ष ठेवणाऱ्या मालकमंडळींकडून हकालपट्टी होते त्यामागे राजकीय दबाव असला पाहिजे, असे त्याचे जे विधान आहे ते वृत्तपत्रस्वातंत्र्याची तरफदारी करणाऱ्या प्रत्येकाला अंतर्मुख बनविल्याखेरीज रहात नाही. □

## □ आणखी एक पक्ष–विदर्भ काँग्रेस

एका पक्षाचे जास्तीत जास्त किती तुकडे होऊ शकतात याबाबत चर्चा चालू असताना कोणी तरी रिपब्लिकन पक्षाचे उदाहरण दिले. प्रत्येक पुढाऱ्याच्या नावाने या पक्षाचा प्रत्येक गट स्वतंत्रपणे वावरताना दिसतो. प्रत्येक गट स्वतःला रिपब्लिकन म्हणवितो आणि स्वतःच्या पुढाऱ्याचे नाव त्याला चिकटवितो. रिपब्लिकन या शब्दाचा मोह काही कोणी सोडीत नाही. विशिष्ट वर्गापुरता आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण असलेला हा पक्ष असल्याने त्याच्या या पाकळ्यांबाबत फारशी चर्चा होत नाही. सर्वसाधारण जनता अजूनही रिपब्लिकन पक्ष ओळखते. कारण खोब्रागडे, कांबळे, गवाई ही सारी पुढारी मंडळी रिपब्लिकन पक्षाचेच नेतृत्व आपण करीत असल्याचा दावा करतात आणि प्रत्येक वेळी आपला गट घेऊन सोइस्कर कॅम्पमध्ये दाखल होतात; पण काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या काँग्रेससारख्या राष्ट्रव्यापी पक्षाचीही सध्या दारुण अवस्था झालेली दिसते. या पक्षाची आणि काँग्रेस या नावाची झाली एवढी चीरफाड थोडी झाली असे वाटल्यावरून पूर्वी मूळ काँग्रेसमध्ये आणि नंतर इंदिरा काँग्रेसमध्ये असलेल्या काही नेत्यांनी आता विदर्भ काँग्रेस या आपल्या नावातच आपल्या व्याप्तीच्या मर्यादा स्पष्ट करणाऱ्या पक्षाची स्थापना केली आहे. शरद पवार मंत्रिमंडळामधील दोन मंत्री भाऊसाहेब सुर्वे आणि भाऊ मुळक यांनी विदर्भ काँग्रेस स्थापन केल्याची घोषणा केली आहे. या दोन नेत्यांखेरीज या विदर्भ काँग्रेसच्या चळवळीला आणखी सात आमदार उभे आहेत. या नवीन काँग्रेसला इंदिराजींबद्दल सहानुभूती आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि या मंडळीचेही नेते असलेले शरद पवार आपण लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि इंदिराजींच्या हुकूमशाही विरोधात उभे असल्याचे मुलाखती देऊन सांगत असताना – भाऊ मुळक इंदिराजींवर एकाधिकारशाही गाजविण्याचा जो आरोप करण्यात येतो तो चुकीचा असल्याची ग्वाही देतात. वास्तविक हे असले काही बोलणे प्रागतिक लोकशाही आघाडीच्या विरोधात जाणारे आहे; पण हे सारे तपशील बघणाराला. मंडळी जमवून सत्तासंपादन आणि सत्तेचा उपभोग यांचा कुंभमेळा करायचा असेल तर भाग वेगळा.

वास्तविक या वेगळ्या विदर्भ काँग्रेसची तशी काही आवश्यकता नव्हती. इंदिरा काँग्रेस सोडून शरदरावांबरोबर आल्यावर त्यांच्या गटात राहण्याने काही आकाश कोसळणार नव्हते; पण सत्तेची खिरापत गटवार वाटली जात असल्याने वेगळा गट करणे सोइस्कर आहे असे वाटल्यानेच ही विदर्भ काँग्रेस अवतीर्ण झाली असावी. शरद पवार यांचे मंत्रिमंडळ हे खरोखरच आघाडीचे मंत्रिमंडळ झाले आहे. शरद पवारांचा संख्येने छोटा पण सामर्थ्याने सर्वांत प्रबळ असा काँग्रेस फुटीरांचा गट, इंदिरा काँग्रेसमधून फुटलेल्यांचा आणि आता स्वतःला विदर्भ काँग्रेस म्हणवून घेणाऱ्यांचा गट, महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस, शे. का. पक्ष, रिपब्लिकन कांबळे गट आणि संख्येने सर्वांत प्रबळ असूनही कोणतीही तडजोड स्वीकारून सत्ता स्वीकारण्यास आतूर झालेला जनता पक्षाचा गट अशा या गटवारीतून हे आघाडी मंत्रिमंडळ उभे राहिले आहे. त्यात पुन्हा जनता पक्ष एकमुखी नाही. जनसंघाची जास्तीत जास्त कोंडी कशी करता येईल याचा अन्य मंडळी जागरूकतेने विचार करीत असतात. काँग्रेसवाल्यांना जुन्या काँग्रेसवाल्यांबद्दल ममत्व वाटत असते. त्यामुळेच आमदारकीचा झेंडा हातात नसतानाही नामदारकीची खुर्ची राखून ठेवली जाते. इतकेच नाही तर तशी ती ठेवण्यात आली आहे असे अगदी जाहीररीत्या वदवून घेतले जाते. आता एवढी मंडळी एकत्र आल्यावर कार्यक्रमही तसाच सणसणीत हवा. म्हणून चाळीस कलमी कार्यक्रमाचा पतंग उडविण्यात आला आहे. वीस कलमांत आमचे प्राण कंठाशी आले होते आणि ही चाळीस कलमे आम्हाला कुठे आणि कसे घेऊन जातील हे सांगता येणार नाही! आता या कलमांत लक्ष घालण्याइतका वेळही आपल्याजवळ नसतो म्हणा. कारण दैनिकातून येणाऱ्या बातम्या पक्षांतर्गत वादावादीचे रामायण सादर करीत असतात आणि मग आपणही शासन किती कलमी कार्यक्रम कसा राबविते यापेक्षा कोणता पक्ष किंवा अधिक अचूक सांगायचे तर पक्षामधील गट कुरघोडी करण्यात बाजी मारतो यावरच चर्चा करू लागतो. □


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**

अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**

अनिल अवचट । सहा रुपये

रंगभूमी । सतीश कामत

# कांते फार तुला मजसाठी !

## एक बाळ कोल्हटकरी नाटक

'वाहतो ही जुडी' या नाटकाचे हजारावर प्रयोग करून धंदेवाईक यश भरपूर मिळविलेल्या बाळ कोल्हटकरांनी गेल्याच आठवडयात 'कांते फार तुला मजसाठी' हे नवं संगीतप्रधान नाटक सादर केलं.

'कांते फार तुला मजसाठी श्रम सखये' हे संगीत सौभद्रमधलं पद. तेच या नाटकाचं शीर्षक आहे. बुवा (प्रसाद सावकार) हे जुन्या काळात रंगभूमी गाजविलेले नट. जुन्या पद्धतीच्या शास्त्रीय आणि नाट्यसंगीतातील दर्दी, रसिक. अर्धांगवायूमुळे त्यांच्या चेहऱ्याचा डावा भाग लुळा होतो आणि बुवांचं गायन आणि अभिनय घराच्या चार भिंतींमध्येच अडकून पडतो; परंतु रंगभूमीशी संबंध तुटत नाही. कारण बुवांचा तरुण मुलगा गजानन (प्रकाश घांग्रेकर) स्वतःची नाटक कंपनी काढून नवनवीन नाटकं बसवित असतो, यशही संपादन करीत असतो; परंतु दोन पिढयांमधील संघर्ष याही घरात असतोच आणि तो सुद्धा संगीताच्या पातळीवर! जुन्या पद्धतीच्या शास्त्रीय आणि नाट्यसंगीतावर बुवांचं नितांत प्रेम, तर जुनं सगळं मोडून टाकून संपूर्णतः नवीन प्रकारचं संगीत निर्माण करण्याचा गजाननाचा हव्यास. त्यामुळे 'प्रिये पहा' किंवा 'नरा मी वंदिले' यासारखी पदे म्हणण्याची बुवांची शास्त्रीय बैठक आणि नव्या संगीताच्या ओढीपायी शब्दांबरोबरच या पदांच्या अर्थाचीही ओढाताण करणारी गजाननाची 'आधुनिक' गायनपद्धत, यांची घरात सतत जुगलबंदीच चालू होते. आपल्या डोक्यात घोळत असलेल्या नव्या चाली विस्कटल्या जाऊ नयेत म्हणून गजानन बुवांना घरातसुद्धा गाण्याची बंदी करतो; पण गायनाचं 'व्यसन'च लागलेले बुवा हा 'बंदीहुकूम' वारंवार मोडतात आणि घरातच कायमच्या पगारावर ठेवलेल्या तबलजी (शेखर खांबेटे) आणि ऑर्गनवाल्यांच्या (वासुदेव चंद्रचूड) सहाय्याने गजानन घरात नसेल तेव्हा आपलं 'व्यसन' चालूच ठेवतात. जानकी (विमल वढावकर) ही बुवांची पत्नी. जुन्या काळच्या नटाच्या वाटयाला येणारे सर्व प्रकारचे चढ-उतार बुवांबरोबर आनंदाने सोसलेली; पण पती आणि मुलाच्या या संघर्षात तिची दोन्हीकडून सारखीच ओढाताण होत असते. बुवांच्या मित्राचीच एक मुलगी – शोभना (सुधा कानडे) नाटकाच्या ओढीने, रंगभूमी गाजविण्याच्या महत्त्वाकांक्षेने बुवांच्याच घरी राहून गजाननच्या नाटक कंपनीत काम करीत असते. तिलाच सून करून घ्यावं असं बुवांच्या पत्नीच्या मनात असतं, तर प्रथम गजाननच्या गायनाने मोहित झालेली पण बुवांचं गायन ऐकल्यावर त्यांचंच शिष्यत्व पत्करणारी शोभना जव्हेरी (जान्हवी पणशीकर) सून म्हणून घरात यावी, असं बुवांना वाटत असतं.

### सोमण बोले नाटक चाले

या सगळ्यांबरोबरच आणखीही दोन महत्त्वाची पात्रं या नाटकात आहेत. त्यातील एक म्हणजे श्री. सोमण. आई-बाप नसल्याने सर्वांची सहानुभूती आणि चतुर बोलण्याने शाबासकी मिळविणारे हे पात्र दस्तुर खुद्द बाळ कोल्हटकरांनी स्वतःकडेच घेतलय. बुवा या सोमणला सदैव मित्रत्वाने, बरोबरीच्या नात्याने वागवीत. सोमण हा कविता करकरणारा, नाटकंही लिहिण्याचा प्रयत्न करणारा, पण सर्वत्र पदरी अपयशच आलेला माणूस. अर्थात बुवांशी सलगी म्हटल्यावर गजाननाच्या मनात त्याच्याबद्दल सल असणंही ओघाने आलंच. या सोमणची एकच खोड ती म्हणजे–नको तिथे, नको ते बोलण्याची. नाटकाची सूत्रं हळूहळू हेच पात्र हातात घेतं; अर्थात अगदी निराळ्या पद्धतीने. सोमणसाहेब स्वतःला नाटककार समजत असल्यामुळे बुवांच्या जीवनावरच, बुवांच्या जीवनांतल्या पिता–पुत्रांच्या संघर्षावर आधारित असं एक वास्तववादी नाटक लिहिण्याचं त्यांच्या मनात येतं आणि तेव्हापासून याही नाटकातले प्रवेश सोमण बोलतील तसेच घडत जातात. (किंवा जसे प्रवेश घडले असतील तसंच सोमण बोलत जातात.) गजाननाच्या नाटक कंपनीत काम करणारा विनोदमूर्ती (केशव जोगळेकर) हा जणू काही बुवांच्या हालचाली आणि बोलण्यावर लक्ष ठेवणारा गजाननाचा गुप्तहेर म्हणूनच वावरतो. सोमणची टिंगल-टवाळी करण्याचाही प्रयत्न हा विनोदमूर्ती सतत करीत असतो. सोमणांच्या दृष्टीने तो बुवांच्या जीवनावरील नाटकातला व्हिलनच असतो.

पुढे सोमणसाहेबांच्या भावी नाटकातील आदेशानुसार गजानन आणि बुवांच्या मित्राची मुलगी शोभना यांचं भांडण होतं. गजानन तिच्या तोंडात मारतो आणि शोभना बुवांचं घर सोडून जायला निघते; पण नाटकात ठरल्याप्रमाणे सोमण तिला आडवा येतो. 'नित्य जीवनक्रम अमुचा' असं हुदके देत म्हणत शोभना सोमणलाही (आणि सोमण प्रेक्षकांना) रडवते. इकडे बुवांनी शोभना जव्हेरीला तिच्या घरी जाऊन गायन शिकवायला सुरुवात केलेली असतेच. मधेच एक छोटासा नाट्यमय प्रसंग येऊन जातो. गजाननाने कंत्राट घेतलेल्या एका नाटकाची नटमंडळी गाडीला उशीर झाल्यामुळे वेळवर येऊ शकत नाहीत. नाटकाची तिकिटं विकत घेतलेले प्रेक्षक, 'आम्हाला नाटकच हवे,' असा कल्लोळ सुरू करतात. शेवटी गैरहजर नटाच्याऐवजी अर्जुनाचे काम करण्याचा विनंती गजानन बुवांना करतो. बऱ्याच काळानंतर तोंडाला रंग लावायला मिळणार, या कल्पनेनेच बुवा मोहरून उठतात; आपली कसर लागलेली धोरवानी आणि सोन्याचं पाणी दिलेला चांदीचा धनुष्य–बाण घेऊन ते गजाननाच्या पाठोपाठ रंगमंदिरात जातात. एव्हाना नाटक सुरू व्हायला बराच उशीर झालेला असतो. बुवा तोंडाला रंग लावून तयार होत असतात. तेवढयात उशीर झालेला नट धावा टाकीत हजर होतो आणि बुवांना रंग उतरवून निरोप देण्यात येतो. अपमानित झालेले बुवा व्यथित अंतःकरणाने घरी येतात. हे असं काही तरी घडणार, असं बुवांच्या पत्नीला बुवा घरातून गेल्यापासून उगीचच वाटत असतं. बुवा घरी आल्यावर पुन्हा पति–पत्नी रडतात, एकमेकांचे डोळे पुसतात. (प्रेक्षक आपापले डोळे पुसतात.)

## दोन पिढ्यांमधला संघर्ष

एव्हाना बुवा आणि गजानन यांच्यातला संघर्ष विकोपाला गेलेला असतो. नाटकात बुवांना काम करू न दिल्याचं प्रेक्षकांना कळल्यावर त्यांचे चाहते ते नाटकच होऊ देत नाहीत. शिवाय महापालिकेतर्फे गजाननचा योगायोगाने (सोमणसाहेबांनीच घडवून आणलेल्या) शोभना जव्हेरीच्याच पिताजींच्या हस्ते सत्कार होतो; पण गजाननपेक्षा ते बुवांचंच अधिक कौतुक करतात. या दोन प्रसंगांमुळे गजानन अधिकच चिडतो. बुवाही दोन शोभनांच्या मदतीने—त्यांना संगीतात उत्कृष्ट तयार करून—गजाननाची खोड कायमची जिरविण्याचा निश्चय करतात. शोभना क्र. १ ( बुवांच्या मित्राची मुलगी) हिला घरी जाण्यापासून परावृत्त केल्यामुळे सोमणने एव्हाना तिची सहानुभूती आणि हळू हळू प्रेमही मिळवलेलं असतंच. (त्याच्या नियोजित नाटकानुसारच हे घडलेलं असतं.) तसंच बुवांचा गजाननाकडून पदोपदी अपमान झाल्यावर 'प्रारब्धाची गती न कळे ती लोकी सार्थचि ते म्हणतो' आणि 'चालला हा कोंडमारा काय अवघे चालले, काल रात्री दिवस होता आज का अंधारले' ही दोन करुण गीतेही शब्दजुळव्या सोमण बुवांकडून म्हणवून घेतो आणि दोन टीपं गाळतो—गाळवितो.

तिसऱ्या अंकात सोमणसाहेबांनीच आखून दिलेली बुवांच्या दोन शोभना आणि गजानन यांची सारंग रागात जुगलबंदी होते. 'बैठे हरी राधेसंग, कुंजबनमे अपने रंग, राधेसंग अपने रंग ......' आणि 'ऋतुराज कहे, कविराज कहो, हो मौसम जिसका राजस हो' या दोन चिजा तिघं मिळून पेश करतात. लाईटस्च्या सहाय्याने तिघांवरही रंगांची सतत उधळण करून सबंध सीन रंगीबेरंगी करून सोडलेला आहे. दहा एक मिनिटांच्या तडाखबाज जुगलबंदी नंतर गजाननराव शस्त्रं टाकून शरण येतात, बुवा आणि त्यांच्या बगल बच्चांना (बच्चिणींचा) जय होतो. जानकोबाई हा सर्व प्रसंग आपल्या खास खुर्चीत बसून डोळे भरून पाहतात आणि थोड्याच क्षणात कायमचे डोळे मिटतात. याचवेळी सोमण आपल्या नाटकाचा शेवटचा सीन लिहून धडपडत स्टेजवर प्रवेश करतो. त्याने लिहिलेला शेवट आणि प्रत्यक्ष स्टेजवर झालेला शेवट—नाटकाचा आणि जानकोबाईंचाही—( पूर्वीच ठरल्याप्रमाणे ) मिळते—जुळतेच असतात. सगळेजण—सामुदायिकपणे अश्रू ढाळतात. बुवांच्या चेहऱ्यावर फोको टाकला जातो, 'बुवा कांते फार तुला मजसाठी श्रम सखये' असं काही तरी आळवू लागतात आणि एकदाचा सर्व प्रकरणावर पडदा पडतो.

तर असं हे कोल्हटकरांचं नवं नाटक—त्यांच्या आजवरच्या 'कर्तृत्वा'ला धक्का लागेल असं काहीही होऊ न देणारं. नाटकातला रोल आणि प्रत्यक्ष रोल एकच असल्यामुळे कोल्हटकरांना तसं वेगळं काहीच करावं लागलेलं नाही. प्रयोग बसवण्यापूर्वीच्या पहिल्या—दुसऱ्या वाचनात त्यांनी सर्व पात्रांना हे नाटक जसं समजावून दिले असेल तसंच ते प्रत्यक्ष प्रयोगाला स्टेजवर वारंवार करतात. कारण सोमण या नाटकातल्या पात्राने लिहिलेले प्रसंग आणि प्रत्यक्ष 'कांते फार तुला मजसाठी' मधले प्रसंग एकच आहेत. फक्त काही वेळा सोमण आधी बोलतो आणि मग प्रसंग घडतो, तर बऱ्याच वेळा प्रसंग आधी घडतो आणि मग सोमण येऊन आपल्याही नाटकात आपण असाच प्रसंग घातला असल्याचं बुवांना सांगतो. लेखनाच्या दृष्टीने नाटक सुमार आणि शब्द बंबाळ आहे. 'मनाच्या मातीत जी मुळं रुजली आहेत ती शब्दांच्या कुऱ्हाडीने तुटत नाहीत,' यासारखी वाक्यं सामान्य प्रेक्षकाला मोहवून टाकण्यासाठी ठराविक अंतरावर व्यवस्थित टाकली आहेत. नाटकातली गीतं आणि कविताही कविपेक्षा शब्दजुळव्याच वाटतात. अधून मधून नव्या, प्रयोगशील नाट्यप्रकारांवर 'असं काही असल्याशिवाय हल्ली नाटक चालत नाही,' असे शितोडे उडवून विनोद करण्याचेही दुबळे प्रयत्न केले आहेत. दिग्दर्शनातही नवा चमक कुठेच नाही. सगळं अगदी कोल्हटकरी थाटाचं !

## स्वाभाविक (?) संगीत

या नाटकाला कोल्हटकरांनी 'स्वाभाविक संगीत 'नाटक' असं म्हटलं आहे. यातला 'स्वाभाविक' हा शब्द वापरण्याचा उद्देश, इतर संगीत नाटकांमध्ये ज्याप्रमाणे बऱ्याच वेळा आवश्यकता नसतानाच संगीत सुरू होतं, तसं या नाटकाचे नाही, असं सुचवण्याचे असेल किंवा ज्या घरात म्हादूसारखा गडीही 'लग्नाला जातो मी' आणि 'सत्य वदे वचनाला' असं म्हणत हिंडतो त्या घरात निर्माण होणारं संगीत हे स्वाभाविकच असणार, असही कोल्हटकरांना सुचवायचं असेल. काहीही असलं तरी प्रत्यक्ष नाटक पाहिल्यावर मात्र यातलही संगीत बऱ्याच वेळा उगीचच आल्यासारखं वाटतं. या नाटकात कोल्हटकरांच्या तोंडी असं एक वाक्य आहे की, पूर्वीच्या संगीत नाटकांमध्ये एकदा संगीत सुरू झालं की, भीम आणि अर्जुन या माणसं मारणाऱ्या लोकांनासुद्धा स्टेजवर माशा मारत बसण्याची वेळ यायची. पण 'कांते फार तुला'मधील सोमणसाहेबही या फेऱ्यातून सुटलेले नाहीत. विशेषतः 'निद्य जीवनक्रम आमुचा' हे गाणं जेव्हा शोभना क्र. १ म्हणायला लागते तेव्हा संबंध नाटकच उगीचच 'ब्लॉक' होतं आणि सोमणसाहेबही टी—पॉयवर बसून अधूनमधून आपले डोळे पुसण्यापलीकडे काहीही करू शकत नाहीत. तसंच 'प्रारब्धाची गती न कळे ती' किंवा 'चालला हा कोंडमारा' ही गीतं जेव्हा बुवा गातात तेव्हा अधून मधून जोरजोरात माना हलविण्यापलीकडे सोमण काहीच करू शकत नाहीत. गजाननराव जेव्हा 'प्रिये पहा' किंवा 'शूरा मी वंदिले' त्यांच्या आधुनिक चालीत म्हणत सुटतात तेव्हा डाव्या बाजूला कोपऱ्यात बुवा जी अस्वस्थता दाखवीत असतात ती बघत स्वतःचं मनोरंजन करून घेण्याची वेळ प्रेक्षकांवर येते. शोभना जव्हेरी स्वतःला गाणं किती येतं, याची चुणुक जेव्हा 'माझे चित्त तुझ्यावर जडले' म्हणत बुवांना ( आणि प्रेक्षकांना ) दाखवीत असते तेव्हा या दोघांची स्थिती सारखीच दयनीय होते. थोडक्यात, इतर संगीतप्रधान नाटकांप्रमाणेच याही नाटकात गीत—संगीत अनेक वेळा घुसडल्यासारखं, ते हवं म्हणून, टाकल्यासारखं येतं. 'स्वाभाविक'पणे येत नाही. अर्थात संगीत स्वाभाविक वाटावं म्हणून आणखीही एक प्रयत्न कोल्हटकरांनी केलाय्. संगीतप्रधान नाटक म्हटल्यावर वेळोवेळी त्यातल्या गीतांना—पदांना साथ करणारे जे तबलजी आणि ऑर्गनवाले असतात ते नेहमीप्रमाणे स्टेजसमोरच्या खळगीत न बसविता कोल्हटकरांनी त्यांना नाटकातलेच पात्रं करून टाकलंय्; पण त्यामुळे फारसा फरक पडत नाही. यात मग संगीत—दिग्दर्शक श्री. जितेंद्र अभिषेकी यांनीच जरा बरी कामगिरी बजावली आहे.

नाटकातल्या अभिनयाविषयी बोलायचं राहिलं. ( अर्थात काही बोललं नसतं तरी चाललं असतं म्हणा.) त्यातल्या त्यात प्रसाद सावकारच काही तरी व्यक्तिरेखा उभी करण्याचा प्रयत्न करीत असल्यासारखे वाटतात. बाकी सर्वांचा सहज सुंदर अभिनय ! प्रकाश घांग्रेकर गायनाची बाजू मात्र बरी लावून धरतात. कोल्हटकर आपले अधून मधून शब्दबंबाळ डायलॉग टाकून सामान्य प्रेक्षकांच्या टाळ्या घेण्यातच धन्यता मानतात.

### रांग पहिली, आसन क्र. १८

रांग पहिली, आसन क्र. १८ हे शब्द नाटकाच्या जाहिरातीमध्ये असे काही टाकले होते की, त्याच्याशी संबंधित काही तरी गहन सस्पेन्स नाटकात असावा, असं वाचणाऱ्याला वाटावं; पण प्रत्यक्षात हा एक अत्यंत भुक्कड प्रकार आहे. बुवा जेव्हा रंगभूमीवर काम करीत होते तेव्हा त्यांचं प्रत्येक काम त्यांच्या पत्नी जानकीबाई नेहमी 'रांग पहिली, आसन क्र. १८' वर बसून पाहात असत. गजाननाचंही मातृप्रेम इतकं उच्च की, बुवांचं रंगभूमीवरील कर्तृत्व संपल्यावर थेटरातली ती खुर्ची गजानन तशीच काढून आणतो आणि आपल्या घरात मातोश्रींना बसण्यासाठी ठेवतो थोडक्यात, या क्षुल्लक बाबीला सबंध नाटकभरच अवास्तव महत्त्व दिलेलं आहे. एखाद्या सस्पेन्स नाटकातल्या 'कोड वर्ड'-प्रमाणे 'रांग पहिली, आसन क्र. १८' हे शब्द या नाटकातली पात्रं आळीपाळीने भावुकपणे उच्चारतात. कोल्हटकरांचं कौशल्य इथंच थांबत नाही. नाटकाच्या शेवटी जेव्हा जानकीबाई मरण पावतात आणि पडदा पडू लागतो तेव्हा प्रत्यक्ष बालगंधर्व रंगमंदिरातील जी पहिल्या रांगेतली १८ नंबरची खुर्ची कोल्हटकरांनी मोकळी ठेवलेली असते (आणि साडेसात रुपये नाहक गमावलेले असतात) त्यावर कोल्हटकर एक जोरदार फोको टाकायला लावतात आणि वर असं म्हणतात की, प्रेक्षकांनी या स्मृती बरोबर घेऊन जावं. हा सर्व निव्वळ फालतूपणा आहे.

'कांते फार तुला मजसाठी' हे 'सौभद्र'-मधलं पद या नाटकाचं शीर्षक आहे. 'आपण आपल्या पत्नीला पुरेसं सुख देऊ शकलो नाही', असं बुवांना जेव्हा जेव्हा वाटतं तेव्हा तेव्हा ते ही ओळ म्हणतात. नाटकाच्या शेवटीही ही ओळ म्हणून ती ठसविण्याचा प्रयत्न केलाय्; पण सबंध नाटकाचा विषय पाहता हे शीर्षक अयोग्य वाटतं. कारण बुवांच्या या वेदनेपेक्षाही नाटकातला जुन्या-नव्यामधला संघर्ष अधिक महत्त्वाचा आहे.

तेव्हा हे बाळ कोल्हटकरांचं नवं नाटक पाहिल्यावर त्यांच्यात कोणत्याच तऱ्हेचा बदल न झाल्याची खात्री पटते. अजूनही प्रेक्षकांकडून तीन तासांच्या बदल्यात दोन हसू, चार टाळ्या, सहा टिपं वसूल करण्यातच कोल्हटकर गुंग दिसतात. अर्थात त्यांच्या इतर नाटकांप्रमाणेच हेही नाटक व्यावसायिक पातळीवर बऱ्यापैकी यश मिळवील, ही शक्यता नाकारता येत नाही. कारण त्यांचा स्वतःचा असा एक प्रेक्षक-पंथही कोल्हटकरांनी निर्माण करून ठेवलेला आहेच की !

□

# '२७ डाउन'

एखाद्या चित्रपटाने भारून जावे, चित्रपटातील शोकात्म अनुभवाने फुटणारा हुदका आतल्या आत जिरवावा आणि शेवटी अश्रूंचाच फोलपणा उमगावा. '२७ डाउन'ने असे होते. फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनतर्फे '२७ डाउन' हा चित्रपट मुंबईत प्रकाशित झाला आहे. जेमतेम दोन तास चालणाऱ्या ह्या चित्रपटाला चार विदेशी व दोन भारतीय पारितोषिकांचा सन्मान मिळाला आहे.

'२७ डाउन'चे निर्माते-दिग्दर्शक आणि पटकथालेखक आहेत स्वर्गीय श्री. अवतार कौल. चित्रपट धवल-कृष्ण रंगात आहे. कलात्मक चित्रपटांच्या मालेत हा चित्रपट अत्यंत यशस्वी ठरलेला आहे. ही एका दुबळ्या मनाच्या तरुणाची शोकात्मिका आहे. संजय शिंदेचं जीवनदर्शन आणि त्यातून घडणारे त्याचे स्वभावचित्रण हा ह्या चित्रपटाचा खरा विषय आहे. चित्रपटाचे कथानक दुय्यम ठरते. संजयच्या आजूबाजूची माणसे व वातावरण यातून संजय कसा घडत गेला, हे दृश्याच्या माध्यमातून व्यक्त करण्याचे आव्हान निर्मात्याने स्वीकारले व ते यशस्वी करून दाखविले.

चित्रपटाची कथा साधी, सोपी आणि सरळ आहे. संजय लहानपणापासून थोडासा एकलकोंडा, आईच्या पंखाखाली वडिलांच्या धाकात वाढलेला. वडील रेल्वेमध्ये इंजिन-ड्रायव्हर असतात. संजयचा जन्मही रेल्वेच्या डब्यात झालेला असतो. रेल्वे आणि रेल्वेचा परिसर यावर त्याचे प्रेम असते. त्याच वातावरणात तो लहानाचा मोठा होतो. एका अपघातात वडिलांचा एक पाय पॅरलाइज होतो. ते एका पायाने अपंग बनतात. त्याची आई मरण पावते. संजय शिल्पकलेचे शिक्षण अर्धवट सोडून वडिलांच्या सांगण्यावरून रेल्वेत कण्डक्टरची नोकरी घेतो. त्याचे शालिनी नावाच्या तरुणीशी प्रेम जमते. तिच्यावर कुटुंबियांची जबाबदारी असते. त्यांचे प्रेम फुलत असताना तो वडिलांनी सांगितलेल्या एका श्रीमंत बापाच्या रुक्ष मुलीशी लग्न करतो. त्याचे मन संसारात रमत नाही. तो घर सोडून जातो. काही काळ बनारसला भटकतो. वेश्येकडे जातो. घरी परत येतो. आपल्या प्रेयसीला भेटायला जातो. काही तरी निर्णय घ्यायचा असे ठरवितो; परंतु ऐन वेळी माघार घेतो आणि हेतुशून्य भटके जीवन जगत राहातो.

असामान्यांची शोकांतिका आपण समजू शकतो. जीवनातील काही मूल्यांसाठी दुःखाला जवळ करणारी माणसे असू शकतात. नियतीच्या फेऱ्यात सापडून अंती दुःखी झालेली निरपराध माणसेही आपल्याला जीवनात दिसू शकतात; परंतु या कथेतील नायकाचे दुःख एका वेगळ्या जातीचे आहे. माणसाचे मूलभूत एकाकीपण त्याचा गळा घोटण्याइतके तीव्र बनू शकते. संजय बुद्धिमान आहे तितका तो संवेदनाशील आहे. कलासक्त आहे आणि तरीही मनाने अतिशय दुबळा, नेभळट आहे. त्याच्या मनाचे दौर्बल्य त्याच्या सर्व इच्छा- आकांक्षांवर अधिराज्य गाजविते व त्याबाबतीत तो काही करू शकत नाही. सर्वसामान्य माणसाच्या स्वभावाचा हा पैलू ह्या चित्राला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातो. प्रत्येक सामान्य माणूस अधिकारासमोर, सत्तेसमोर कच खातो, हे एक जीवनातील सत्य आहे. किंबहुना हेच सामान्यांचे सामान्यत्व आहे. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची ताकद ज्यांच्यात नसते त्यांच्या जीवनाचे भेदक दर्शन ह्या चित्रपटात होते.

संजयच्या अस्थिरतेचे द्योतक म्हणजे त्याचा सदोदित चालणारा आगगाडीचा प्रवास. धावणारे आगगाडीचे जग हे त्याच्या दृष्टीने खरे असते. तो म्हणतो हे 'दूर पळणे मला आवडते. प्रत्येक व्यक्तीपासून आणि प्रश्नापासून तो दूर पळतो. 'मैं लौटके नहीं आ सकता।' तो बुद्धिमान असतो याचे द्योतक म्हणजे त्याला पडणारे प्रश्न. प्रश्न निर्माण करण्याइतकी त्याची बुद्धी प्रगल्भ असते. उत्तरे शोधण्यासाठी तो धडपडतो. तो मूर्ख नाही. शहाणा आहे. तो कलासक्त आहे. रसिक आहे. पहिल्या भेटीत त्याला शालिनीचे सौंदर्य व्हीनसच्या संगमरवरी शिल्पासारखे जाणवते. पत्नीने केसाला लावलेले खोबरेल तेल त्याला उबग आणते, इतकी त्याची संवेदनशीलता जागृत असते. त्याचे वडील त्याचे सबंध जीवन आखून देतात आणि कसलाही प्रत्यक्ष विरोध न करता तो ते स्वीकारतो. त्याला बायकोचा, वडिलांचा, कुणाचाच झडझडून संताप येत नाही आणि प्रेयसीवरही तो आसुसून प्रेम करू शकत नाही. शालिनी सहजपणे त्याच्या गळ्यात हात घालते तेव्हा तो बिचकतो. मिटलेल्या ओठांच्या आत त्याचे मनोविश्व अनेक

प्रश्नांनी धगधगत असते. सामान्यांना बोचणारे सामान्यपण आणि भीरु मनाची अगतिकता, कौटुंबिक तणाव यातून उभे राहिले आहे.

ह्या चित्रपटाचे शीर्षक '२७ डाउन' ही गाडी वाराणशी ऊर्फ बनारसला जाणारी. संजय ह्या आगगाडीत झोपलेला असतो. येथून चित्रपटाला सुरुवात होते. नंतर फ्लॅशबॅक पद्धतीने त्याचे लहानपण दाखविले जाते. वैवाहिक जीवनाला कंटाळून तो ह्या गाडीत येऊन बसतो. पुढे त्याचे आगगाडीच्या वेगाने भरकटत जाणारे जीवन दिसते.

आगगाडी आणि रेल्वेचे पुन्हा पुन्हा येणारे दृश्य चित्रपटाला एक आधुनिक यंत्रसंस्कृतीचे परिमाण देते. स्टेशनांची नावे, त्या पाट्या, रेल्वेचे पूल, जेवणडब्याचे दृश्य, प्लॅटफॉर्मस्, गाडीचे रूळ, गाडीचा यार्ड, इंजिनाची शिटी, बोगद्यात शिरणारी आगगाडी, सिग्नल्स् अशा बारीक बारीक दृश्यांतून संजयच्या जीवनातील निराशा अनेक पदरी बनत जाते. एका दृश्यात रिकाम्या प्लॅटफॉर्मवर गाडी येते व प्लॅटफॉर्म माणसांनी भरून जातो. तो इतका भरतो, गर्दी इतकी दाट होते तरी आगगाडीतून माणसे उतरतच असतात. एक अनामिक भयाची सुप्त जाणीव व्यक्त होते. संजयचा सासरा त्याच्या घरात म्हशी आणतो, डेअरी चालवून पैसा मिळविण्यासाठी; परंतु समृद्धीचे साधन म्हणून म्हशी सासऱ्याला आणि संजयच्या बायकोला हव्या असल्या तरी निबर चेहेऱ्याची बायको आणि निर्बुद्ध म्हैस ह्यातील भयानक साम्य संजयला जाणवते. हळू हळू आपणही म्हशीप्रमाणे संवेदनाशून्य बनत जाऊ, असे वाटून तो घाबरतो. निव्वळ कॅमेराच्या सहाय्याने ही अर्थपूर्णता व्यक्त केली आहे.

संजयची भूमिका के. एन्. रैना ह्या नटाने उत्कृष्ट वठविली आहे. आजची सुप्रसिद्ध अभिनेत्री राखी शालिनीच्या भूमिकेत अभिनयाचे श्रेष्ठत्व पटवून जाते. नोकरी करणारी, घराची जबाबदारी उचलणारी, आत्मविश्वासपूर्ण पावले टाकणारी तरुणी म्हणून ती जितकी समर्थपणे उभी राहते तितकीच प्रेमभावनेत आकंठ बुडालेल्या शालिनीचे नाजुक, कोमल भाव अत्यंत सहजतेने व्यक्त करते. संजयची पत्नी म्हणून रेखा सबनीस भूमिकेला योग्य न्याय देते. संजयचे वडील ओम् शिवपुरी आपली कामगिरी चोख बजावतात. वास्तव चित्रण, अर्थपूर्ण पार्श्वसंगीत आणि आगगाडीच्या गतीचा योग्य तो वापर यामुळे '२७ डाउन' चित्र संथ असले तरी संथपणा बोचत नाही. शब्दांचा कमीत कमी वापर आणि संगीतावर व दृश्यावर अधिक भर देणारा हा चित्रपट जीवनाच्या गूढतेचा गहिरा प्रत्यय देतो.

—सौ. मोहिनी वर्दे

## घटश्राद्ध

### दोन प्रतिक्रिया

'संदर्भ घटश्राद्ध' हा अशोक प्रभाकर डांगे यांचा लेख वाचला. (माणूस : १२ ऑगस्ट अंक) यमुनाआक्काच्या शोकांतिकेला देह-धर्म, पाप-पुण्य, धर्म-संस्कृती इ. कल्पना कारणीभूत आहेत आणि म्हणूनच त्या कल्पनांचा उपहास करून कथाविषयाला उगाचच भावविवशतेचे (Melodramatic) रूप डांगे यांनी दिले आहे.

१. यमुनाक्का विधवा असूनही सकेशा आहे. तेव्हा उदाप्पा हा दशग्रंथी ब्राह्मण सनातनी असूनही सुधारणावादीही आहे. पाठशाळेतल्या मुलांवरही तो आवश्यक तेवढीच शिस्त लादत असे. म्हणूनच चोरून का होईना, पैसे लावन पत्ते खेळणे किंवा बिड्या ओढणे विद्यार्थ्यांना शक्य होत असे. शिवाय कृतीत तो कुठेही कर्मठ, आकांडतांडव करणारा वाटत नाही. तेव्हा उदाप्पाचा कारण नसताना लेखात उपहास केलेला आहे. 'उदाप्पांना काय ह्या वयातही आपला समाज एखादी तरुण पत्नी मिळवून देईल... यातनं आणखी एक विधवा... चारित्र्यवान धर्माभिमानी माणूस, परंपरा पाळणारा पुरुष... ! वगैरे वाक्ये तर उदाप्पांसारख्या व्यक्तिरेखांवर व त्यांच्या प्रवृत्तींवर अन्याय करणारी आहेत.

२. यमुनाअक्काच्या शोकांतिकेला ती स्वतःच जबाबदार आहे. स्वतः विधवा असूनही ती जाणीवपूर्वक मास्तरशी प्रेमसंबंध ठेवते व त्यातूनच पुढे शरीरसंबंध होऊन तिला गर्भ राहतो. वास्तविक पाहता तिने समाजविचारांशी विद्रोह केला पाहिजे होता आणि मास्तरने प्रतारणा केली असली तरी स्वतंत्रपणे जगण्याचा निर्धार केला पाहिजे होता. अन्यथा समाजकल्पनांना बळी जाण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. जो तिने स्विकारला.

३. यमुनाअक्कासारख्या स्त्रियांच्या भावनांना फसवून असहाय्यतेचा गैरफायदा घेणारे व प्रतारणा करणारे मास्तरसारखे सुशिक्षित हे जितके भ्याड असतात तितकेच यमुनाअक्काबद्दल केवळ शाब्दिक सहानुभूती व्यक्त करणारे किंवा टीका करणारे तथाकथित सुशिक्षित पुरुषही नेहमीच भ्याड असतात. त्यांच्या मनात असतात स्वप्नं, डोक्यात असतात हिशेब आणि वागण्यात असतो भ्याडपणा !' परिस्थितीचे आव्हान स्वीकारून परिणामांची जबाबदारी धीटपणे स्वीकारणारे आणि कृती करणारे सुशिक्षित पुरुष हे अपवादात्मकच होत असतात आणि तेव्हाच ती व्यक्तिमत्त्वं निराळी ठरत असतात.

४. चित्रपटातील वेद-अध्ययनाचा काळ ही पार्श्वभूमी आणि त्या पार्श्वभूमीवर घडणारी यमुनाअक्काची शोकांतिका ही अत्यंत स्वाभाविकपणे आणि सामान्यपणे घडते. अशी शोकांतिका ही केवळ ब्राह्मणवर्गातच घडत असते काय ? जाति-धर्मानुसार पार्श्वभूमी बदलली तर अशी कथा ह्या पद्धतीनेच घडेल असे वाटते. तेव्हा केवळ पोक्त संस्कृति-धर्म, दैदिप्यमान परंपरा, कुळ, शील इ. ब्राह्मण वर्गाचा उपहास करणारे शब्द निरर्थक वाटतात. विवाहबाह्य संबंधातील अनीतीच्या कल्पना ब्राह्मण-ब्राह्मणेतर समाजात कोणत्याही काळात समानच असतात.

५. एकूण 'घटश्राद्ध' हा एक बऱ्यापैकी चित्रपट आहे एवढेच म्हणता येईल. नीति-अनितीचा सनातन संघर्ष इथे अगदी सरळ स्वरूपात मांडलेला आहे. कोणीही मायेचा पूत मास्तरसारख्या समाजपुरुषाला साधा जाबही विचारू शकत नाही इतके समाजाचे एकांगी, उथळ चित्रण तार्किकदृष्ट्या, मानसशास्त्रीय किंवा समाजशास्त्रीयदृष्ट्या पटतच नाही. प्रकर्षाने ह्या संदर्भात आठवण होते ती 'रेयॉन्स डॉटर 'सारख्या प्रगल्भ चित्रपटाची. अर्थात कोणत्याही प्रकारची तुलना व्यवहार्य ठरणार नाही याची जाणीव आहे.

—अनिल किणीकर

मा. संपादक,

स. न.

'घटश्राद्ध'वरील परीक्षण वाचले. या निमित्ताने मला आपल्याला असे सुचवावेसे वाटते की, ज्या समीक्षकाला ज्या चित्रपटाची भाषा बिलकूल अवगत नाही अशा व्यक्तीचे समीक्षण हे प्रसिद्ध करणे हा त्या त्या कलाकृतींवर मोठाच अन्याय असतो. हा मूकचित्रपटांचा जमाना नाही. आज जर एखादा मूक-चित्रपट निघाला, तर त्यावर जरूर त्यांनी परीक्षण लिहावे. चित्रपटामध्ये हालचाली, दृश्यं, संगीत इ. कलात्मक गोष्टी ह्या चित्रपटात महत्त्वाच्या असतातच. तरी पण त्या सर्व गोष्टींचा आत्मा म्हणजे आशय भाषेतून व्यक्त होतो. याचा अर्थ आपल्याला जी भाषा अवगत नाही अशा कलाकृती आपण पाहू नयेत किंवा त्यांचा आस्वाद घ्यायला आपण असमर्थ असतो, असेही नाही; पण एवढे मात्र नक्की की अशा कलाकृतींवर आपले जे मत असते ते सार्वजनिक स्वरूपात प्रकाशित करण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नसतो.

—विजय कारेकर

---

## खुलासा

---

स. न.

□ माणूसच्या बारा ऑगस्टच्या अंकातील माझ्या 'संदर्भ : घटश्राद्ध' ह्या लेखावरील दोन प्रतिक्रिया वाचल्या. श्री. अनिल किणीकर यांचे टिपण व प्रा. विजय कारेकर यांचे पत्र. याबाबत मी खालील गोष्टी स्पष्ट करू इच्छितो.

(१) श्री अनिल किणीकर हा लेख 'उगाचच भावनाविवशतेनं' लिहिलाय असं म्हणतात. मुळात 'संदर्भ: घटश्राद्ध' हे 'घटश्राद्ध' ह्या चित्रपटाचे 'व्यावसायिक' परीक्षण नव्हे. एका भारतीय स्त्रीची शोकांतिका दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली पडद्यावर मांडतात. पडद्यावर पाहिलेल्या ह्या अन्यायाची एक प्रतिक्रिया म्हणूनच ह्या लेखाकडे पहावं लागेल आणि अशी प्रामाणिक प्रतिक्रिया अधिक भावनाविवशतेनं व्यक्त झाल्यास ते अस्वाभाविक म्हणता येणार नाही.

(२) उदाप्पांचा उदारमतवादी दृष्टिकोन दाखविण्यासाठी यमुनाक्का विधवा असूनही सकेशा असण्याकडे 'किणीकर लक्ष वेधतात; पण ह्यामागे उदाप्पांच्या उदार दृष्टिकोनापेक्षा इतरच सामाजिक कारणे अधिक करून असावीत. किंबहुना विधवांचं 'सरसकट' केशवपन करण्याची प्रथा मागे पडल्याचं ते प्रतीक असावं. असं असेल तर त्यात उदाप्पांच्या सुधारकपणाचा संबंधच कुठे येतो? आणि तरीही दुराचारी विधवेचं केशवपनही कुठल्याच सामाजिक परिस्थितीत समर्थनीय म्हणता येणार नाही. याशिवाय पाठशाळेतल्या विद्यार्थ्यांनी चोरून—मारून बिड्या ओढणं, पैसे लावून पत्ते खेळणं हे उदाप्पांच्या सुधारकपणाचं लक्षण कसं काय ठरतं ते किणीकरच जाणोत! उदाप्पांचं समर्थन करण्याच्या भरात त्यांनी चुकीची उदाहरणं पुढं केली आहेत हे निश्चित.

(३) यमुनाक्काच्या शोकांतिकेला किणीकर तिला स्वतःलाच जबाबदार धरतात. तिनं 'विद्रोह करून स्वतंत्र जगायला पाहिजे होतं' असही म्हणतात. ह्या 'विद्रोह' वगैरे किणीकरांच्या आधुनिक कल्पना झाल्या; पण यापुढं जाऊन तिनं मास्तरशी जाणीवपूर्वक संबंध ठेवल्यानं (आणि नंतर 'विद्रोह' वगैरे न केल्यानं) तिचा स्वाभाविक पणे बळी गेला असं म्हणणं म्हणजे एका परीनं तिच्यावरच्या अन्यायाचं समर्थन करणंच होय, असं म्हणावं लागेल.

(४)यमुनाक्काच्या शोकांतिकेबद्दल शाब्दिक सहानुभूती व्यक्त करणाऱ्या 'तथाकथित' सुशिक्षितांबद्दल किणीकर आपला राग व्यक्त करतात. 'त्यांच्या मनात असतात स्वप्न, डोक्यात असतात हिशोब' यासारखं कानेटकरी थाटाचे चमकदार वाक्यही ते लिहून जातात. भ्याडपणा तर सार्वत्रिकच असतो! पण सर्वसामान्यतः 'ज्यांच्या मनात स्वप्नं असतात ते हिशोबी नसतात आणि हिशोब करून जगणाऱ्यांना अशी स्वप्नं पडत नसतात' हे मात्र इथे किणीकर विसरतात.

५. 'घटश्राद्ध' ची चित्रपटकथाच एका विशिष्ट पार्श्वभूमीवर घडते. परंपरा पाळणाऱ्या, तिचा अभिमान धरणाऱ्या, विशिष्ट वर्गात ती घडते म्हणून तर तिचं अधिक महत्त्व ह्या साऱ्याच पार्श्वभूमीतून दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली यांनी सामाजिक उपरोध अतिशय प्रभावीपणे दाखवून दिलाय. हा उपरोधच ह्या चित्रपटाचा आत्मा आहे. श्री. किणीकर म्हणतात त्याप्रमाणे इतर कुठल्याही पार्श्वभूमीवर ती कथा अशाच पद्धतीनं घडेल असंच काही निश्चित म्हणता येणार नाही. नीति-अनीतीच्या कल्पना सारख्याच असल्या तरी त्यांच्या प्रतिक्रिया प्रत्येक सामाजिक घटकात, सारख्याच प्रतीत होतील असंही म्हणता येणार नाही.

६. 'घटश्राद्ध' च्या संदर्भात किणीकर 'रॉयन्स डॉटर' सारख्या अगदी वेगळ्या प्रकारच्या आणि वेगळ्या पार्श्वभूमीच्या चित्रपटाची मोजमापं का लावतात हेच समजू शकत नाही घटश्राद्धसारख्या बहुसंख्य प्रेक्षकांना चांगल्या वाटलेल्या चित्रपटाला बरं; पण उथळ आणि एकांगी म्हणून किणीकर निश्चितच त्या कलाकृतीवर अन्याय करीत आहेत असंच म्हणावं लागेल. इतर चारचौघांच्या मतांपेक्षा काही 'वेगळं' सांगणं म्हणजेच 'नवेपण' समजणारे 'तथाकथित'- रसिक प्रेक्षक, ह्याच काय पण इतर चांगल्या कलाकृतींवरही नेहमीच असा अन्याय करीत आले आहेत.

७. प्रा. कारेकर आपल्या पत्रातून चित्रपटाची भाषा समजण्याचा प्रश्न उपस्थित करतात; पण कुठलीही श्रेष्ठ कलाकृती भाषेच्या मर्यादा ओलांडून पलीकडे जात असते आणि एका परीनं त्यातच तिचं श्रेष्ठत्वही असतं हे ह्या संदर्भात नव्यानं सांगण्याची आवश्यकता नाही. अशा चांगल्या चित्रपटकथेचा, विषय सर्वसाधारण परिचित असल्यास, त्यावर 'संदर्भ, घटश्राद्ध' सारखा प्रतिक्रियात्मक लेख लिहायलाही मुळीच हरकत नसावी. अर्थात प्रा. कारेकर यांच्यासारख्या सुजाण लोकांनी अशा पूर्वग्रहदूषित भूमिकेतून कुठलंही लिखाण वाचावं आणि त्यावर वैयक्तिक पातळीवरून अशी हलक्या प्रकारची प्रतिक्रिया नोंदवावी हे मात्र दुर्दैव!

अशोक प्रभाकर डांगे

पुणे ३०

## प्रसिद्धिपूर्व सवलत योजना

जगातल्या निरनिराळ्या क्रांत्या–उत्क्रांत्यांनी म्हणा किंवा सामाजिक, राजकीय इत्यादी स्तरांवर मांडलेल्या गणितांची उत्तरे सापडल्याच्या आनंदात असणाऱ्या विचारवंतांना ती चुकीची निघाल्याचा अनुभव येऊ लागल्यामुळे म्हणा, विचारवंत पुन्हा एकदा गांधी-टॉलस्टॉय यांसारख्या ऋषिवर्यांकडे वाट पुसायला जाणार असे मला वाटू लागले आहे. तुमच्या ग्रंथाचे म्हणून मला फार मोठे मोल वाटते.

–पु. .ल. देशपांडे

महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार आणि ‘ ललित ’ पारितोषिक
लाभलेल्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे.

# टॉलस्टॉय–एक माणूस

## लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

- ☐ प्रसिद्धीनंतरची या ग्रंथाची किंमत पंचावन्न रुपये.
- ☐ १५ सप्टेंबरपूर्वी नोंदणी केल्यास किंमत पस्तीस रुपये.
- ☐ रजि. पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास तीन रुपये अधिक.
- ☐ रक्कम म. ऑ. किंवा ड्राफ्टने पाठवावी.
- ☐ व्ही. पी. पद्धत नाही.
- ☐ ग्रंथ २ ऑक्टोबर–गांधीजयंतीला प्रसिद्ध होत आहे.

**प्रसिद्धीपूर्व नोंदणी खालील ठिकाणी सुरू आहे.**

१ : राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०.

२ : मॅजेस्टिक बुक स्टॉल । शनिपाराजवळ, पुणे २ । किंवा । गिरगाव नाका, मुंबई ४.